दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के


बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड रविवार, दि.२०ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक७८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# मुस्लिमांनो तोपर्यंत आपलं भलं होणार नाही!

सुजात आंबेडकर म्हणाले, प्रस्थापित राजकारण उधळून टाका

**सर्वात जास्त मुस्लिमांना उमेदवारी देणार वंचित एकमेव पक्ष**

**वंचितने थेट राज ठाकरेंवर हल्ला चढवला**

**काँग्रेस, राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेनेचे नेते आमचा कसा करतील?**

वाशीम/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीनंतर वंचित बहुजन आघाडीने आता विधानसभा निवडणुकीत आपलं नशिब आजमावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानिमित्ता वंचितने प्रचारदौरे आणि सभा घेण्यास सुरुवात केली आहे. तसंच, सत्ताधारी अन् विरोधकांवरही तोफ डागली आहे. यावेळी वंचितने थेट राज ठाकरेंवर हल्ला चढवला आहे. वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचे सुपूत्र सुजात आंबेडकर यांनी वाशिममध्ये राज ठाकरेंवर टीका केली. ते उमेदवार मेघा डोंगरे यांच्या प्रचारासाठी वाशिममध्ये गेले होते.सुजात आंबेडकर म्हणाले, मुस्लिमांसाठी फक्त वंचित बहुजन आघाडी लढते. ते (राज ठाकरे) म्हणतात आम्ही मोठमोठे स्पीकर लावू, भोंगे लावून त्यावर हनुमान चालिसा वाजवू. मात्र, त्याला विरोध करून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा भोंगा उतरवण्याचं काम सर्वांत आधी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते करतील, असं सुजात आंबेडकर म्हणाले.

### १५ टक्के मुस्लीम उमेदवार हवेत

जोपर्यंत मुस्लिमांचे चार–पाच आमदार निवडून येत नाहीत, तोपर्यंत त्यांच भलं होणार नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे प्रस्थापित नेते आमचा विकास करू शकणार नाहीत. १५ टक्के मुस्लीम समाज महाराष्ट्रात आहे आणि जो पक्ष १५ टक्के त्यांना भागीदारी देईल, १५ टक्के उमेदवारी देईल, त्यांनाच मतदान करून आपल्याला विजय करायचा आहे, असं सुजात आंबेडकरांनी स्पष्ट केलं. वाशिम जिल्ह्यात महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी अशी लढत होणार आहे. त्यामुळे जनता कोणाच्या बाजूने कौल देतेय हे पाहावं लागेल.

### भाजपाकडून नाराजीदूर करण्याचा प्रयत्न

पोहरादेवी (जि. वाशीम) हे देशातील १० कोटींवर बंजारा समाजाचे श्रद्धास्थान. यवतमाळ व वाशीम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी सातत्याने पुढाकार घेऊन पोहरादेवी येथे बंजारा विरासत नंगारा वास्तूसंग्रहालय निर्माण केले. ५ ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संग्रहालयाचे लोकार्पण झाले. या कार्यक्रमास दोन लाखांच्यावर बंजारा समाजबांधव उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान मोदी बंजारा समाजाच्या प्रश्नांबाबत बोलतील, अशी अपेक्षा होती. मात्र, मोदी यांनी त्याबद्दल अवाक्षरही काढले नाही. त्यामुळे या कार्यक्रमानंतर बंजारा समाजात संतापाची लाट उसळली. यामुळे बंजारा समाज विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विरोधात जाण्याचा धोका निर्माण झाल्याने भाजपने थेट या समाजाचे धर्मगुरू बाबुसिंग महाराज यांनाच विधान परिषदेवर पाठवून समाजाची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला, असे बोलले जात आहे.

## ऐन निवडणुकीत आणखी एक मोठा धक्का

पक्षांतर: आमदाराचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षाच्या नेत्यांमध्ये सध्या बैठकांचा धडाका सुरु आहे. लवकरच जागावाटपही जाहीर होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. यातच अनेक नेते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. अशातच ऐन निवडणुका जाहीर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्क्यावर धक्के बसत असल्याचं पाहायला मिळत आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा पक्ष प्रवेश आज मुंबईत शरद पवार, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यामुळे पान २ वर...

### अजित पवारांना फलटणमध्ये...

काही दिवसांपूर्वी आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांचे बंधू आणि सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी १४ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची साथ सोडत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला. तसेच फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला होता. त्यामुळे अजित पवारांना फलटणमध्ये मोठा धक्का बसला होता.

## इस्रायलचे पंतप्रधानांच्या घरावर ड्रोन हल्ला

देशविदेश: हमासच्या नेत्याची हत्या होताच मोठी घडामोड

पीटीआय/ दिल्ली

हमास अतिरेकी संघटनेचा म्होरक्या याह्या सिनवार याचा खात्मा केल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी युद्ध थांबविण्याबाबत मोठे विधान केले होते. जर हमासने बंदी केलेल इस्रायलचे नागरिक परत केल्यास युद्ध थांबविण्याची तयारी दर्शविली होती. मात्र आता रॉयटर्सने दिलेल्या बातमीनुसार, पंतप्रधान नेत्यानाहू यांच्या सिझेरिया शहरातील खासगी



निवासस्थानाला ड्रोनने लक्ष्य करण्यात आले आहे. या हल्ल्याच्या वेळी नेत्यानाहू आणि त्यांच्या पत्नी घरी हजर नव्हत्या, अशी माहिती पंतप्रधान कार्यालयाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. तसेच या हल्ल्यात कुणीही जखमी झाले नसल्याचीही माहिती मिळत आहे.नेत्यानाहू यांच्या निवासस्थानाव्यतिरिक्त आणखी दोन ड्रोन लेबनानमधून डागले गेले होते. पण हवाई दलाने ते हाणून पाडले. या हल्ल्यानंतर आता राजधानी तेल अविवमध्ये पुन्हा एकदा सायरनचा आवाज पान २ वर...

## मतदार यादीत नाव नोंदविण्याचे आवाहन

निर्णय: यादीत नाव नोंदविण्यासाठी अखेरची संधी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीत मतदान करता यावे यासाठी मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी शनिवार,१९ ऑक्टोबर पर्यंत मतदार यादीत नाव नोंदविता येणार आहे, तरी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व पात्र मतदारांनी आपली नावे नोंदवून आपला मतदानाचा हक्क बजवावा,असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी मतदारांना केले आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ करीता मतदान करण्यासाठी आपण पात्र असाल मात्र आपले नाव मतदार यादीत नसेल तर अजूनही वेळ गेलेली नाही. शनिवार, १९ ऑक्टोबर पान २ वर...

## वीज पडून एकाचा मृत्यू

नाथापुर/पुण्यभूमी प्रतिनिधी



येथे विजांच्या कडकडासह पाऊस चालू असताना वीज पडून एकाचा मृत्यू झाला. नाथापूर येथील शेतकरी कुटुंबातील संतराम अण्णासाहेब देवडकर हे आपल्या शेतामध्ये कापूस वेचानिकरिता गेले असता अचानक विजांच्या गड गडासह पावसाची सुरुवात झाली त्यामुळे त्यांनी लिंबाच्या झाडाचा असरा घेतला त्याच वेळी विजेचा मोठा आवाज होऊन लिंबाच्या झाडावर वीज कोसळली व या

## वंचितच्या उमेदवारांची चौथी यादी जाहिर!

पडघम: वंचितचे मते ठरणार निर्णायक

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. निवडणूक आयोगाकडून राज्यात निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. वीस नोव्हेंबरला विधानसभेसाठी मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. यावेळी राज्यात महायुती विरोधात महाविकास आघाडी असाच सामना रंगण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे या निवडणुकीच्या रिंगणात मनसे, एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी या पक्षांनी देखील उडी घेतल्यामुळे निवडणुकीची रंगत आणखी वाढणार आहे. काही ठिकाणी या पक्षांमुळे मतदानाचं गणित देखील बिघडू शकतं. याचदरम्यान मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे वंचित बहुजन आघाडीनं उमेदवारांच्या शर्यतीमध्ये आघाडी घेतली असून, वंचितकडून उमेदवारांची चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे.वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारांची चौथी यादी जाहीर करण्यात आली




आहे. या यादीमध्ये एकूण १६ उमेदवारांचा समावेश आहे. यापूर्वी वंचित बहुजन आघाडीकडून तिसरी यादी जाहीर करण्यात आली होती. त्यामध्ये तीस जणांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. चौथ्या यादीमध्ये शहदा, साक्री, तुमसर, अर्जुनी मोरगाव, हादगाव, भोकर, कळमनुरी, सिल्लोड, कन्नड, औरंगाबाद पश्चिम, पैठण, महाड, गेवराई, आष्टी,कोरेगाव, कराड दक्षिण अशा सोळा मतदारसंघाचा समावेश आहे.राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. यंदा महाविकास पान २ वर...

**आचारसंहिता** निवडणूक आयोगाचे सरकारला महत्त्वाचे निर्देश!

## लाडकी बहिण योजनेचा निधी थांबवला!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांसाठी मोठी बातमी आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत २ कोटी २० लाखांहून अधिक पात्र महिलांना पाच महिन्यांचे हप्ते प्राप्त झाले आहेत. परंतु, निवडणुकीच्या काळात पुढचे हप्ते महिलांना मिळू शकणार नाहीत. कारण, तात्पुरत्या स्वरुपात लाडकी बहीण योजनेला स्थगिती मिळाली आहे. तसंच, या योजनेअंतर्गत नवे अर्ज स्वीकारणंही बंद करण्यात आलं आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार, राज्यात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळे राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या काळात मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या आर्थिक योजना बंद कराव्यात अशा सूचना निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिल्या आहेत. त्यानुसार, महिला आणि बालकल्याण विभागाकडून या योजनेसाठी लागणारा निधी थांबवला आहे. परिणामी निवडणुका होईपर्यंत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांना मिळणार नाहीत. दरम्यान, राज्य सरकारने या योजनेअंतर्गत ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्र पैसे दिले होते. त्यामुळे आता डिसेंबर महिन्याच्या हप्त्याची प्रतिक्षा करावी लागणार आहे.



### योजनेला स्थगिती, नेमकं कारण काय?

आर्थिक लाभ देऊन मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या योजना त्वरीत थांबवल्या पाहिजेत, अशा सूचना मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या. तसंच, आर्थिक लाभ देणाऱ्या योजनांचा आढावाही घेण्यात आला. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सर्व विभागांकडे याबाबतची विचारणा केली. त्यानुसार, महिला आणि बालकल्याण विभागाकडून लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ दिला जात असल्याचं समोर आलं. त्यामुळे विभागाकडू या योजनेची माहिती मागवण्यात आली आहे. विभागाने या योजनेसाठीचे निधी वितरण चार दिवसांपूर्वीच थांबवल्याची माहिती आयोगाला देण्यात आली. परिणामी निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे ही योजना तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

## तमन्ना भाटियाच्या अडचणींमध्ये वाढ

कारवाई: महादेव बेटिंग प्रकरणात ईडीकडून चौकशी

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बॉलिवूड अभिनेत्री तमन्ना भाटियाने आजवर अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. स्त्री २ या चित्रपटातल्या तिच्या गाण्यानेही लक्ष वेधलं होतं. तसंच बाहुबली सिनेमातील तिची भूमिकाही अनेकांच्या स्मरणात आहे. याच तमन्ना भाटियाच्या अडचणींमध्ये मोठी भर पडली आहे. कारण ईडीकडून तमन्नाची कसून चौकशी झाल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी तमन्नाला ईडीने समन्स धाडलं होतं. त्यानंतर तमन्नाची गुवाहाटी येथील ईडी कार्यालयात चौकशी करण्यात आली. अभिनेत्री तमन्ना तिच्या आईसह ईडी कार्यालयात पोहचली होती. गुरुवारी दुपारी तिला चौकशीसाठी बोलवण्यात आलं. ज्यानंतर काही तास तिची चौकशी



सुरु होती.ऋळीझश्रू नावाचं अ‍ॅप आहे याचं प्रमोशन केल्याचा आरोप तमन्नावर आहे. हे अ‍ॅप महादेव बेटिंग अ‍ॅपशी संबंधित आहे. या अ‍ॅपवर मनोरंजन क्षेत्र, क्रिकेट, पोकर, बॅडमिंटन, कार्ड गेम्स, फुटबॉल या सगळ्यासाठी बेटिंग करता येतं. या अ‍ॅपचं प्रमोशन केल्यानं तमन्ना चर्चेत आली. त्यामुळे तिच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. पान २ वर...

### तमन्नाचे चाहते चिंतेत

तमन्नाना आत्तापर्यंत विविध चित्रपटांमध्ये काम केलं आहे. दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये तिच्या भूमिका जास्त आहेत. बाहुबली या सिनेमानंतर तिने अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काही वेबसीरिजमध्येही काम केलं आहे. तिचा असा एक खास चाहता वर्ग आहे. एक्स या मायक्रोब्लॉगिंग साईटवर तमन्नाची ईडी चौकशी झाल्याची बातमी पोस्ट करण्यात आली आहे. त्यानंतर तिचे चाहतेही चिंतेत आहेत.

# कथित दूरसंचार घोटाळा

दशकभरापूर्वीच्या सत्तांतरामागे कथित दूरसंचार घोटाळा हे एक कारण होते. मनमोहन सिंग सरकारातील दूरसंचारमंत्री ए. राजा हे त्यातील मुख्य आरोपी. हा 'घोटाळा' (?) कसा झाला हे आठवणे आता मनोरंजक ठरेल. याचे कारण दूरसंचारातील ज्या निर्णयांमुळे भ्रष्टाचार झाला असे तत्कालीन विरोधी पक्ष भाजपस त्या वेळी वाटले तोच मार्ग सत्ताधारी असलेल्या भाजपने दूरसंचारासाठी आत्ता निवडलेला असून त्या वेळी ज्या मार्गास खासगी कंपन्यांचा विरोध होता तोच मार्ग आता खासगी कंपन्यांस हवाहवासा वाटू लागला आहे. दूरसंचार क्षेत्रातील या बदलत्या कंपनलहरी समजून घेणे आवश्यक.त्या'वेळी दूरसंचारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भाजपने केला कारण तत्कालीन दूरसंचारमंत्री राजा यांनी दूरसंचारासाठीची आवश्यक कंपनलहरींची (स्पेक्ट्रम) कंत्राटे प्रशासकीय अधिकारात दिली. त्यांचा लिलाव केला नाही. तो केला असता तर केंद्र सरकारच्या तिजोरीत एक लाख ७६ हजार कोटी रुपये जमा झाले असते, ते बुडाले; म्हणून दूरसंचाराचा राजा-निर्णय हा 'एक लाख ७६ हजार कोटी रुपयांचा घोटाळा' असे तर्कट तत्कालीन महालेखापाल विनोद राय यांनी लावले आणि विरोधी पक्षीय भाजप, माध्यमे यांनी तेच तुणतुणे वाजवायला सुरुवात केल्याने घोटाळ्याचा आरोप सिंग सरकारला चिकटला. नंतर सरकार गेल्यावर कळले की असा काही भ्रष्टाचार झालेलाच नव्हता. सर्वोच्च न्यायालयातही हे सत्य समोर आले. कल्पनेत असलेले उत्पन्न प्रत्यक्षात न मिळाल्याने वास्तवात भ्रष्टाचार झाला; असे मानले गेले. ही कंपन-कंत्राटे दूरसंचार 'टू जी' सेवेसाठी होती. सद्या:स्थितीत 'फाईव्ह जी', 'सिक्स जी' यांची चर्चा सुरू आहे आणि ही कंपन कंत्राटे कशी दिली जावीत यावरून सरकार आणि खासगी दूरसंचार कंपन्या यांत मतभेद निर्माण झाले आहेत. 'त्या'वेळी सरकारने कंपन-कंत्राटे प्रशासकीय मार्गाने देण्याचे समर्थन केले. ''दूरसंचार क्षेत्र बाल्यावस्थेत आहे, अशा वेळी अधिक महसुलाच्या मिषाने त्यांच्यावर अधिक दडपण टाकणे योग्य नाही'', ही भूमिका प्रमोद महाजन ते राजा अशा सर्व दूरसंचारमंत्र्यांची होती. पण महाजनांच्या काळात हा युक्तिवाद मान्य करणाऱ्या आणि सिंग सरकारच्या काळात मात्र तो अमान्य ठरवून भ्रष्टाचाराचा आरोप करणाऱ्या भाजपचे म्हणणे वेगळे होते. ''लिलाव केल्यास कंपन्या अधिकाधिक रकमेची बोली लावतील आणि सरकारचा महसूल वाढेल'', असा भाजपचा युक्तिवाद. पुढे यावर राजकीय रामायण झाले. सिंग सरकार गेले. सर्वोच्च न्यायालयात 'त्या' व्यवहारात काहीही भ्रष्टाचार नसल्याचे सिद्ध झाले. मात्र; ''सरकारी मालकीची साधनसंपत्ती यापुढे लिलावाच्या मार्गानेच विका'' अशा अर्थाचा दंडक सर्वोच्च न्यायालयाने त्यात घालून दिला. आता तोच दंडक पाळण्यात विद्यमान सत्ताधारी भाजपस रस नाही. विद्यमान दूरसंचारमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनीच ही बाब स्पष्ट केली. आताची कंपन-कंत्राटे ही प्रशासकीय निर्णयाद्वारे विकली जातील, असे त्यांचे ताजे विधान. ही कंपन-कंत्राटे उपग्रही (सॅटेलाइट टेलिफोनी) संपर्क सेवेसाठी सरकार देऊ पाहते. 'त्या'वेळी हा निर्णय होता जमिनीवरून चालवल्या जाणाऱ्या- म्हणजे सध्या वापरली जाते त्या- सेल्युलर मोबाइल सेवेबाबत. विद्यमान सेवेत मोबाइल आपल्या मोबाइलमधून जाणारा वा येणारा संदेश जवळची 'सेल्युलर साइट' (म्हणजे मोबाइल फोन टॉवर) पकडते आणि आपणाशी संपर्क साधणाऱ्या मोबाइलपर्यंत तो संदेश असा खांबा-खांबांवरून पोहोचवते. ही सेवा कार्यक्षम असली तरी तीस मर्यादा येतात. म्हणजे ज्या भागात मोबाइल टॉवर्स नाहीत तेथे मोबाइल फोन सेवा चालत नाही. खेडी, दुर्गम भाग, डोंगरी प्रदेश वा रेल्वेदी वाहनांत असताना मोबाइल सेवा खंडित होते ती त्यामुळे उपग्रह-चलित दूरसंचार सेवेचे असे नाही. तीत अवकाश-स्थित उपग्रहांच्या माध्यमांतून संदेशवहन होत असल्याने तीस हे असले 'जमिनी अडथळे' रोखू शकत नाहीत. मोबाइल फोन सेवेचा हा पुढचा टप्पा. त्याची कंपन-कंत्राटे प्रशासकीय मार्गानेच दिली जातील, असे विद्यमान सरकारचे म्हणणे. ''हे क्षेत्र नवीन आहे'' असे त्याबाबतचे एक कारण. मग प्रश्न असा की 'टू जी' सेवा सुरू झाली तेव्हा ती नवीनच होती आणि तेच नावीन्याचे कारण त्या सरकारने प्रशासकीय मार्गाने कंत्राटे देण्यासाठी पुढे केले होते. त्या वेळी खासगी कंपन्यांस तो मार्ग योग्य वाटला कारण तो दिरंगाईचा नव्हता. 'तो' मार्ग अवघड होता, तो दूरसंचार क्षेत्रातील नवख्या कंपन्यांसाठी. कारण बहुराष्ट्रीय, देशी बड्या प्रस्थापित कंपन्यांस त्या कंपन-कंत्राटांत नवख्या कंपन्यांच्या तुलनेत आघाडी होती. त्याचमुळे त्या वेळी रतन टाटांसारख्या उद्योगपतीने लिलाव बरा अशी भूमिका घेतली होती. त्यास त्या वेळी 'एअरटेल'च्या सुनील मित्तल यांनी कडाडून विरोध केला. 'टाटांना पैसे जास्त झाले असतील तर त्यांनी पंतप्रधान मदत निधीस द्यावेत' हे मित्तल यांचे त्या वेळचे विधान. पुढे टाटा समूह दूरसंचार क्षेत्रातून बाहेर पडला.तो अधोरेखित करण्यासाठी या वेळी महालेखापाल विनोद राय नाहीत वा अण्णा हजारे, बाबा रामदेव वा किरण बेदी यांच्यासारखी पात्रेही नाहीत. त्यात हा विषय तांत्रिक. तो समजून घेता आला नाही तरी त्यावर भ्रष्टाचारादी आरोप करणारी माध्यमेही या वेळी शांत! परिणामी सरकारच्या भूमिकेतील बदल जनसामान्यांस कळणारदेखील नाही, अशी परिस्थिती. जी पद्धत एकेकाळी भ्रष्टाचाराचे कारण ठरली, तीच पद्धत आता चर्चेचा विषयदेखील नाही. 'असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे' असे संतश्रेष्ठच म्हणून गेले आहेत. यापेक्षा निराळा 'अभ्यास' सत्ताधाऱ्यांचा असल्याने 'त्या'वेळी जे अभ्रष्ट असूनही भ्रष्ट झाले ते आता अभ्रष्ट; असे सरकार म्हणते. तेव्हा 'अभ्रष्ट ते भ्रष्ट, करिता सायास' असे म्हणणे कालानुरूप ठरावे.

# डिग्री ही विद्यार्थी जीवनातील माईल स्टोन

## मंत्री गजेंद्रसिंह शेखावत :एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीत समारंभ

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

सतत नवे ज्ञान आत्मसात करणे, आव्हानांचा सामना करणे, कठिण परिश्रम आणि सतत पुढे जाण्याची जिद्द हेच गुण विद्यार्थी जीवनाचा माईल स्टोन असेल. कॉर्पोरेट जगात पाऊल ठेवताना स्वतःला सिद्ध करा आणि आपल्या गुणांच्या आधारे कुटुंब व संस्थेची प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य करावे. असे विचार केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा ६ वा दीक्षांत समारंभ शनिवारी विश्व सभामंडप, विश्वराजबाग, लोणी-काळभोर, पुणे येथे पार पडला. यावेळी विद्यापीठाच्या ५४७८ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विज्ञान क्षेत्रात आयुष्यभर केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल प्रसिद्ध शास्त्रज्ञ भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार पद्मश्री डॉ. कृष्णस्वामी विजय राघवन यांना एमआयटी डब्ल्यूपीयू विज्ञान महर्षी सन्मान देऊन गौरविण्यात आले. सन्मानपत्र, सरस्वतीची मुर्ती व ५ लक्ष रूपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय व्यावसायिक सल्लागार प्रा. रामचरण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे



कुलगुरु डॉ. आर. एम. चिटणीस, सीईओ डॉ. संजय कामतेकर, कुलसचिव प्रा. गणेश पोकळे आणि परीक्षा नियंत्रक डॉ. राहुल जोशी, तसेच विद्यापीठाचे अधिष्ठाता व संचालक हे सर्व उपस्थित होते.

या प्रसंगी विद्यार्थी अभिजीत पवार याला 'फाउंडर प्रेसिडेंट मेडल' व विद्यार्थिनी अनुश्री कुलकर्णी हिला 'एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट मेडल' ने गौरविण्यात आले. तसेच १२२ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक, ८५ रौप्य व ८५ कास्य पदक असे एकूण २९५ विद्यार्थ्यांना मेडल बहाल करण्यात आले. तसेच २६ विद्यार्थ्यांना पी.एचडी देण्यात आली. यामध्ये ४३५ विद्यार्थी मेरीट लिस्ट मधील आहेत.अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, कम्प्यूटर सायन्स ॲण्ड इंजीनियरिंग, रामचरण स्कूल ऑफ लिडरशीप बिझनेस, ईकॉनॉमिक्स ॲण्ड कॉमर्स, स्कूल ऑफ गर्व्हनमेंट, हेल्थ सायन्य अँड टेक्नॉलॉजी, सायन्स अँड एन्व्हायरमेंटल स्टडीज, डिझाइन, लिबरल ऑर्टस, लॉ आणि कॉन्शसनेस या व्यतिरिक्त अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

गजेंद्रसिंह शेखावत म्हणाले, तंत्रज्ञानाच्या काळात ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. हजारो वर्षाचे ज्ञान गेल्या १०० वर्षात कित्येक पटीने वाढले आहे. तसेच गेल्या १० वर्षात नवे प्रयोग व नवे ज्ञान समोर येत आहे. अशावेळेस विद्यार्थ्यांनी सतत शिकत रहावे आणि ज्ञान आत्मसात करावे. आज माहिती तंत्रज्ञानामुळे आपल्या बोटांमध्ये संपूर्ण जगाचे ज्ञान आले आहे. वर्तमान काळात मानव जीवनाला समृध्द करण्यासाठी सर्व समस्यां सोडविण्यावर भर दिला जावा.

२१ व्या शतकाला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी कृतीशील शिक्षणाकडे वळताना संकल्पनात्मक शिक्षणाची कास धरली पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्यामधील सुप्त कौशल्य गुणांचा शोध घेवून त्यांचा विकास करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. असेही केंद्रीय मंत्री शेखावत यांनी सांगितले.

डॉ. कृष्णस्वामी विजय राघवन म्हणाले, गेल्या १५ वर्षात सृष्टीवर पर्यावरण, वातावरण बरोबर आर्थिक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अशा वेळेस विद्यार्थ्यांनी वर्गापेक्षा बाहेरच्या जगाला समजून घेणे गरजेचे आहे. समाजातील सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपली दिशा निश्चित करावी.

प्रा. रामचरण म्हणाले, विद्यार्थ्यांना यशासाठी संपूर्ण आकाश उघडे आहे. देशाची आर्थिक स्थिती उत्तम असतांना आपण डिग्री घेतली आहे. त्यामुळे हा आपल्यासाठी गोल्डन इरा आहे. या काळात देशाची जीडीपी वृद्धी होत आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पना या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पदोपदी ज्ञान उपलब्ध आहे त्याचा लाभ घ्यावा. वाढते सोशल नेटवर्क आणि सर्वात महत्वाचे विद्यार्थ्यांना आपले ध्येय लक्ष निर्धारित करून यश मिळविता येते.प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञान ही तत्व जीवनात शांती निर्माण करतात. आज संपूर्ण भारताला भगवान गौतम बुद्ध आणि म. गांधी यांच्या नावाने ओळखले जाते. विद्यार्थ्यांनी शिस्त आणि वचन बद्धतेचे पालन करावे. तसेच धर्म आणि स्वतःच्या कर्तव्याला ओळखावे. भविष्यात सुख-समाधान आणि शांतीचा मार्ग दाखविण्याचे दायित्व भारताचे आहे.राहुल कराड म्हणाले, आम्ही समाजाचा एक महत्वपूर्ण भाग आहोत. अशा वेळेस येथील संविधान हे अत्यंत महत्वपूर्ण असल्यामुळे समाजातील सर्व समस्यांचे समाधान करणे विद्यार्थी व आमची जवाबदारी आहे. हे विद्यापीठ जागतिक स्तरावरील ज्ञानाबरोबरच आध्यात्मिक ज्ञान देऊन विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. परिवर्तनीय भारतासाठी विद्यार्थ्यांची महत्वाची भूमिका असेल.ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्हिडीओच्या माध्यमातून संदेश दिला. कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस यांनी प्रस्ताविक व स्वागतपर भाषण केले. प्रा. डॉ. शालिनी टोंपे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राहुल जोशी यांनी आभार मानले.

# पान एक वरून

### ऐन निवडणुकीत आणखी

अजित पवारांना ऐन निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे.गेल्या काही दिवसांपासून डॉ.राजेंद्र शिंगणे हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. तसेच ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चाही होती. याच अनुषंगाने डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार यांची भेट देखील घेतली होती. यानंतर त्यांनी प्रतिक्रिया देत मतदारसंघातील नागरिकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेत आपण पुढचा निर्णय घेणार असल्याचं सूचक विधान केलं होतं. त्यानंतर आज अखेर डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला.माजी मंत्री आणि आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश हा अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. डॉ.राजेंद्र शिंगणे हे सिंदखेडराजा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर आता त्यांना पुन्हा एकदा सिंदखेडराजा मतदारसंघामधून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, राजेंद्र शिंगणे यांच्या विरोधात त्यांची पुतणी गायत्री शिंगणे बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

### इस्त्रायलचे पंतप्रधानांच्या

घुमू लागला आहे. लेबनानमधून हा ड्रोन हल्ला केल्याचे सांगितले जात आहे. याह्या सिनवार याची हत्या केल्यानंतर दोनच दिवसांनी लेबनानकडून इस्त्रायलला लक्ष्य केल्याचे सांगितले जात आहे.हमासचे कंबरडे मोडल्यानंतर इस्त्रायलने लेबनानमधील हेझबोला संघटनेला लक्ष्य केले होते. २७ सप्टेंबर रोजी बैरुतमध्ये इस्त्रायलने हल्ला करून हेझबोलाचा प्रमुख हसन नसरल्लाह याला ठार केले होते. यानंतर हेझबोलाने इस्त्रायलचा सूड उगविण्याची शपथ घेतली होती. तेव्हापासून इस्त्रायल आणि लेबनान यांच्यात उघड युद्ध सुरू आहे. लेबनाने इस्त्रायलवर मध्यंतरी १८० क्षेपणास्त्रही डागले होते. इस्त्रायल आणि हेझबोला यांच्या संघर्षामध्ये आतापर्यंत २,३५० लोकांचा मृत्यू झाला आहे, तर १०,९०६ लोक जखमी झाले आहेत.इस्त्रायली संरक्षण दलाने (आयडीएफ) रफाह येथे केलेल्या हल्ल्यात याह्या सिनवार मारला गेला असल्याचे इस्त्रायलने गुरुवारी सांगितले. इस्त्रायलच्या ड्रोन व्हिडीओमध्ये हल्ल्यानंतर याह्या सिनवार दिसत असल्याचा दावाही करण्यात आला आहे. 'कसाई' म्हटल्या जाणाऱ्या याह्या सिनवारचा हल्ल्यात मृत्यू झाल्याचा व्हिडीओ इस्त्रायलच्या लष्कराने शेअर केला असून त्यात याह्या सिनवार एका हवाई हल्ल्यात उद्ध्वस्त झालेल्या घरात जखमी अवस्थेत बसल्याचे दिसत आहे.

### वंचितच्या उमेदवारांची चौथी

आघाडीविरोधात महायुती असाचा सामना रंगण्याची शक्यता आहे. जागा वाटपांबाबत पक्षांच्या बैठकांचं सत्र सुरू आहे. लवकरच जागा वाटप जाहीर करण्यात येईल. या सर्वांमध्ये वंचितनं आघाडी घेतली आहे. पक्षाकडून आतापर्यंत उमेदवारांच्या चार याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. मात्र राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता यावेळी उमेदवारांची यादी जाहिर झाल्यानंतर इच्छुकांची नाराजी दूर करून पक्षातील बंडखोरी रोखण्याचं आव्हान सर्वच पक्षांसमोर असणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीकडून काही जागांवर उमेदवारांची नावं उशिरानं घोषित करण्यात आली, त्याचा मोठा फटका हा त्या मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांना बसला. मात्र यावेळी ही चूक टाळून लवकरच महायुतीकडून उमेदवार जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीच्या गोटात देखील हालचालींना वेग आला आहे.

### मतदार यादीत नाव नोंदविण्याचे

ही मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी शेवटची तारीख आहे. १९ ऑक्टोबर पर्यंत आपण मतदार होऊ शकता. यासाठी व्होटर हेल्पलाइन हे मोबाईल www.voters.eci.gov.in या वेबसाइटवर सुद्धा ऑनलाइन पद्धतीने मतदार नोंदणीचा फॉर्म नमुना ६ भरु शकता किंवा मतदान नोंदणी अधिकारी कार्यालयात जाऊन मतदार होऊ शकता. यासंदर्भात १८००-२२-१९५० या हेल्पलाइनचीही मदत घेऊ शकता.मतदार यादी अंतिम करण्याची प्रक्रिया ही नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुरू असते. त्यामुळे ज्या मतदारांनी आपल्या नावाची नोंद केली नाही त्या सर्वांनी आपली नावे उद्या म्हणजेच शनिवार दि.१९ रोजी या दिवसात मतदार यादीत समाविष्ट होईल यासाठी प्रयत्न करावेत.१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत वयाचे १८ वर्ष पूर्ण केले आहे असे तरूण तरुणीही मतदार होण्यास पात्र आहेत. आपल्या मोबाइलवर व्होटर हेल्पलाइन प डाऊनलोड करून याबाबतची माहिती मिळू शकते. तसेच www.voters.eci.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करावी,असे आवाहनही केले आहे.

### वीज पडून एकाचा

शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला.त्यांच्या पश्चात त्यांना तीन मुलं आई आणि पत्नी असा परिवार आहे.अत्यंत शांत स्वभावाचे म्हणून नाथापूर येथे ते प्रसिद्ध होते.त्यांच्या निधनाने नाथापूर येथे शोककळा पसरली आहे.तरी शासनाने या शेतकऱ्यास तत्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### तमन्ना भाटियाच्या

ती आता थेट ईडीच्या रडारवर आहे त्यामुळेच तिची गुवाहाटी येथील ईडी कार्यालयात चौकशी करण्यात आली.महादेव बेटिंग ॲप प्रकरणात आत्तापर्यंत रणबीर कपूर, श्रद्धा कपूर यांनाही समन्स पाठवलं गेलं होतं. तसंच या प्रकरणात गेल्या वर्षी कपिल शर्माचीही चौकशी झाली होती. या सगळ्यानंतर आता तमन्ना भाटियाच्या अडचणी वाढल्या आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे. या प्रकरणात आत्तापर्यंत ईडीने एकूण ४९० कोटींहून अधिक मालमत्ता जप्त केल्याचीही माहिती आहे. ऋळीझश्रू हे एक बेटिंग ॲप आहे. त्यात अनेक प्रकारचे गेम्स आहेत ज्यावर सट्टा लावता येतो. समोर आलेल्या माहितीनुसार या महादेव बेटिंग ॲपच्या माध्यमातून ५७ हजार रुपये गुंतवल्यास रोज ४ हजार रुपये मिळतील असं आमीष लोकांना दाखवण्यात आलं आहे. घोटाळा करण्यासाठी शेल कंपन्यांच्या नावे बनावट अकाऊंट तयार करण्यात आली आहे. लोकांनी गुंतवलेले पैसे क्रिप्टो करन्सी आणि बिटकॉईन्समध्ये गुंतवण्यात आले आहेत अशीही माहिती समोर आली आहे.

# पान सहा वरून

### परळी पालिकेने लावला

सदरील कर आकारणी चुकीची आहे व ती रद्द ठरवावी व दुसरी विंनती अशी केली कि नगरपरिषद परळी वैजनाथ यांनी आजपर्यंत आजपर्यंत नाव नोंदणी (पीटीआर) साठी जी रक्कम परळी शहरातील नागरिकांकडून अनाधिकृत पणे वसूल केली आहे ती रक्कम त्यांना नगरपरिषद कडून परत मिळावी अशी विंनती करून याचिका दाखल केली असता सदरील याचिकेमध्ये दिनांक १६/१०/२०२४ रोजी सुनावणी झाली. सदरील याचिकेवर मा. न्यायामूर्ती अवचाट साहेब व धोटे साहेब यांनी नगर परिषद परळी वैजनाथ यांना नोटीस काढून पुढील सुनावणी दिनांक २७/११/२०२४ रोजी मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे ठेवण्यात आलेली आहे.

### बायकोनेकडून नवऱ्याला जाळून

अडवुन शिवीगाळ केली. तसेच त्याला लाथा-बुक्याने मारहाण केली. निखील समुद्रे याने चाकुने त्याच्या डाव्या हाताच्या वार केला. त्याच्या आराडाओरड्याने आजुबाजुच्या दुकानातील लोक बाहेर आले. तेव्हा समुद्रे याने तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देऊन तेथुन निघुन सात जणांवर गुन्हा दाखल यासंदर्भात गुरुवारी (दि. १७) त्याने केज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून त्याच्या बायकोसह विशाल दत्तात्रय मस्के, बाबा पठाण, निखील समुद्रे, सिध्दी नितीन काळे, सुरज नाईकवाडे आणि करण हजारे सर्व रा. केज या सात जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे तपास करीत आहेत.

### माकप निवडणूक

राज्य समिती कडे दोन्ही मतदारसंघांत निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे. माकप राज्य समिती ने महाविकास आघाडी कडे दोन्ही मतदारसंघ मिळावे अशी आग्रही मागणी केली आहे. बीड जिल्ह्यात माकपने शेतकरी, कष्टकरी, असंघटित क्षेत्रातील कामगार व विद्यार्थी-युवकांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. तसेच शोषित, वंचित व महिलांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. दोन्ही मतदारसंघांत माकप ची संघटनात्मक बांधणी आहे. समाजातल्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये पक्षाला मानणारे व चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी आहे. २०१८ पासुन केलेल्या आंदोलनामुळे कोट्यवधी रुपयांचा पिक विमा लाखो शेतकऱ्यांना मिळाला आहे. त्यासह असंघटीत क्षेत्रातील कामगांराना न्याय मिळवून देण्यात आला आहे. त्यामुळे परळी वैजनाथ व माजलगाव मतदारसंघ महाविकास आघाडी ने माकप साठी सोडावा अशी मागणी करण्यात आलेली आहे. दोन्ही मतदारसंघांत माकप ताकतीने निवडणुका लढविणार असल्याचे माकपचे राज्य समिती सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी व्यक्त केला आहे.

### परळीत शेतकरी संवाद

४२३ किलोमीटर प्रवास तर दुसरा टप्पा ६ दिवस ६८ गाव ३०० किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून या संवाद यात्रेने हजारो नागरिकांशी थेट संवाद साधला गेला. शेतकऱ्याच्या हक्काचि पिकविमा शेतकऱ्यांना अजूनही भेटला नाही, अतिदृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या शेतक-याना अनुदान भेटले नाही, राज्य सरकारने व कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांना कुठलाही आधार दिला नाही २५ टक्के अग्रीमची घोषणा करून आजतागत दोन महिने उलटुन गेले यामुळे शेतक-यांमध्ये खूप मोठा रोष दिसून येतो आहे. मतदारसंघात बहुतांश रस्त्याची खूप मोठी दुरावस्था दिसून येत आली. कुठल्याही गावाला पांदण रस्ते, शेत रस्ते झालेले नाहीत दळणवळण आणि विकासाच्या दृष्टीने ज्या काही गोष्टी करणं गरजेचं होत अपेक्षित होत असं कुठलंही काम परळी मतदारसंघातील जनतेला दिसत नाही. कृषिमंत्र्यांनी पाच वर्षांमध्ये किमान पाच गावांना पाच वेळा सुद्धा भेटी दिलेल्या नाहीत. शासनाच्या अनेक योजना ह्या सर्वसामान्य लोकांना मिळालेले नाहीत. कृषिमंत्र्यांनी फाईव्हस्टार एमआयडीसीच्या फक्त अनेक वेळा घोषण व बातम्या लावल्या, चर्चा केल्या पण प्रत्यक्षात कुठलंही काम केलेले दिसून येत नाही. वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या अनेक अडचणी सध्या असून मागच्या सहा सात वर्षापासून हा कारखाना बंद झाला आहे. मंत्रीपद मिळाल्यानंतर प्रगती होणे अपेक्षित असताना उलट परळी विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व नागरिकांच्या उत्पन्नात घट झाल्याचे सुनील गुट्टे यांनी सांगितले.शेतकरी संवाद यात्रेच्या मार्गदर्शिका सौ. सुदामतीताई गुट्टे व शेतकरी नेते कालिदास दादा आपेट यांच्या नेतृत्वाखाली यात्रा संपन्न झाली अनेकांनी शेतकरी संवाद यात्रा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम केले.

### तिटकारा असलेल्यांना जागा

आमदार नमीताताई मुंदडा यांना जर परत निवडून दिले तर मराठा समाजाला आरक्षण तर मिळणारच नाही परंतु मराठा समाजाच्या मुलाबाळांचे हाल अपेष्टा नक्कीच बघावी लागेल कारण माजी आमदार नमीताताई मुंदडा यांनी मराठा आरक्षणासाठी कुठलेही काम केले नाही कायम मराठा आरक्षणाल विरोध करत आलेल्या माजी आमदार नमीताताई मुंदडा यांना येणाऱ्या विधानसभेत जनता जनार्दन दाखवून जागा दाखवून देणार आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

### अनेक इच्छुकांच्या

चाळणीतून चाळून तर घ्यावे लागणार आहे त्याचबरोबर दुर्बिणीतूनही पाहावे लागणार आहे. अनेकांनी जास्तीत जास्त दुर्बीण आपल्याकडेच आकर्षित करण्यासाठी वेगवेगळे बार उडवले आहेत. मोठ्या थाटामाटात बोहल्यावर चढण्या अगोदरच वाजंत्री कलकलाट पक्षश्रेष्ठींच्या कानापर्यंत जाईल असा केलेला आहे. मात्र केवळ कलकलाट करुन पक्षश्रेष्ठींचे कान तृप्त होतील असे नाही. तर एकदा बोहल्यावर चढवल्यानंतर तो कशाप्रकारे तग धरुन राहील याची फुटपट्टी ही पक्षश्रेष्ठी लावत आहेत. काही इच्छुकांनी तर मध्येच रणांगण सोडून पळ काढला आहे. केवळ दोन ते तीन इच्छुक उमेदवार सध्या तग धरुन आहेत आणि प्रत्येक इच्छुक मलाच बोहल्यावर चढवणार आहेत असा शब्द दिल्याचे गावोगाव जाऊन सांगत आहेत. मात्र श्रेष्ठींच्या मनात कोण भरले ? हे अद्याप गुलदस्त्यात आहे. त्यामुळे येत्या चार-पाच दिवसांमध्ये केज विधानसभेच्या बोहल्यावर चढण्याचा मान कुणाला मिळतो हे इच्छुकांपेक्षा काही तथाकथित राजकीय विश्लेषक करताना दिसत आहेत. तर मतदारही इच्छुकांचे जसे वारे आहे तसे शब्दरुपी उधळण करत आहेत. अशा या विश्लेषणामध्ये आणि अंदाजामध्ये इच्छुक उमेदवारांच्या मात्र पोटात गोळा उठल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे इच्छुकांची जरी झोप उडाली असली तरी तथाकथित विश्लेषक आणि स्वयंघोषित अनुभवी आपापल्या परीने आणि कधीच पुढे न आलेल्या सूत्रांच्या हवाल्याने त्यांच्या पातळीवर उमेदवारी घोषित करताना दिसत आहेत.

### नगरमध्ये अंतयात्रेला मोफत

जावे लागते समाजातील गोरगरीब कष्टकरी यांच्यासाठी भिंगार येथील जेष्ठ बौद्ध नागरिक यांनी हा रथ तयार केला आहे तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडिया या संस्थेच्या वतिने हा निवारण रथ नगर शहर भिंगार तसेच शहारातील जवळील तालुकातील गावे यांच्या साठी सेवा देणार आहे ज्यांना कोणाला हा हवा असेल त्यांनी बौध्द जेष्ट नागरिक संघं भिंगार व तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडिया यांच्या संपर्कसाठी नंबर वर ९९७०७७५५२२ /८९९९२८८६९९ संपर्क साधावा असे आवाहन बहुत ज्येष्ठ नागरिक संघ भिंगार व तथागत बुद्धीस्ट सोसायटी इंडिया अनगर यांनी केले आहे या निःशुल्क निवारण रथ शहरातील गोरगरीब कष्टकरी समाजाचा साठी उपलब्ध करून देण्यात आला बद्दल नगर शहरातील अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक व स्वागत केले आहे आज ही समाजात माणुसकी आहे यांचे आदर्शवत उदाहरण या संस्थेने दिले आहे.

### शेतकऱ्यांच्या हितासाठी

तसेच माजलगाव मतदारसंघातल्या प्रस्थापित राजकीय पुढार्यांची गुंडागर्दी, प्रशासनाकडून शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवण्यासाठी शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा एक मताने निवडून द्या असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव विधानसभेचे उमेदवार भाई ड नारायण गोले पाटील यांनी सुरमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथे कॉर्नर सभेत बोलताना केले, यावेळी व्यासपीठावर भाई मुंजा पांचाळ,भाई भास्कर कांबळे, भाई श्रीराम शेवाळे, राजेभाऊ घोडके, संभाजी चव्हाण यांची उपस्थिती होती तर सुरुमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथील गावकरी प्रचंड संख्येने उपस्थित होते, भाई ॲड नारायण गोले पाटील यांना जनतेतून प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसत आहे. याशिवाय पाच वर्षात तालुक्यात माजलगाव मतदार संघात शेतकऱ्यांसह, कामगारांच्या, तरुणांच्या, विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उदासीनता दाखवत शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या भाजपला बळ दिले त्यामुळे जनतेशी गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा याशिवाय जाती-जातीत भांडणे लावणाऱ्या आणि महागाई वाढवुन देशोधडीला लावणाऱ्या व शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव न देणाऱ्या, मराठा समाजा सह धनगर समाजाला आरक्षण नाकारणाऱ्या सरकारला घरचा रस्ता दाखवण्यासाठी शेतकऱ्याच्या कुटुंबातील कार्यकर्ता म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या खटारा चिन्हावर मत देऊन विजयी करण्याचे आवाहन भाई ड नारायण गोले पाटील यांनी केले यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राहुल सोळंके, भाई श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, भाई भास्कर कांबळे, यांच्यासह सरवर पिंपळगाव, सोमठाणा, अडोळा शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

### ...तर महायुतीतुन बाहेर

आठवले यांच्या १० ते १२ जागा रिपब्लिकन पक्षाला मिळाल्या पाहीजे ह्या मागणी कडे दुर्लक्ष करत आहेत अस दिसत आहे व त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार नाराज होताना दिसत आहेत.रिपब्लिकन पक्षाकडे निवडुन येणारे अनेक इच्छुक उमेदवार आहेत त्यांना जर आता रिपब्लिकन पक्षाने तिकिट देवून नाही लढवू शकले तर रिपबंलिकन पक्ष भविष्यात कधीही मान्यता प्राप्त पक्ष बनु शकणार नाही परंतु महायुतीच्या व भाजपच्या हे लक्षात येत नाही व ह्याप्रकारच्या वागणुकीमुळे २०२४ च्या जाहीर झालेल्या निवडणुकीत याचा फटका महायुतीला बसु शकतो महाराष्ट्रातील आंबेडकरी समाजाची मागणी वाढत आहे कि ना रामदास आठवले यांनी विधानसभा निवडणुकीत जर १० ते १२ जागा रिपब्लिकन पक्षाला सन्मानाने मिळत नसतील तर ह्या निवडणुकीत महायुतीतुव बाहेर पडावे . यावर समाजात मोठी चर्चा चालु आहे . त्यामुळे या संदर्भात लवकरच रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रिय अध्यक्ष ना.रामदास आठवले यांची भेट घेवुन यासंदर्भात लवकर निर्णय घ्यावा असे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राज्य सचिव भास्कर रोडे यांनी अशी मागणी करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# शेतीसाठी नाविन्यपूर्ण संशोधन गरजेचे!

## डॉ.बाबासाहेब ठोंबरे : विलासराव देशमुख महाविद्यालयात कार्यशाळा

लातूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील वनस्पती जैवतंत्रज्ञान विभागाने नुकतीच कृषि जैवतंत्रज्ञान क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी शिक्षण व संशोधन प्रशिक्षण या विषयावर तीन दिवसीय (१६-१८ ऑक्टोबर, २०२४) कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेच्या समारोपास अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब ठोंबरे तर डॉ. रणजीत चव्हाण, अधिष्ठाता, कृषि व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालय, चाकूर, डॉ. विनोद चव्हाण, प्रा. सुधीर साळुंखे, प्रशिक्षण समन्वयक डॉ. राहुल चव्हाण, यांची प्रमुख उपस्थिती होती. अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी अध्यक्षीय भाषणात कार्यशाळेच्या यशाबद्दल कौतुक व्यक्त केले आणि शेती, शेतकरी व पशुपालकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शाश्वत व नाविन्यपूर्ण संशोधनाची गरज असल्याचे नमूद केले. ते पुढे असे म्हणाले कि, तरुण वैज्ञानिक सक्षम आणि ऊर्जावान असून, ते आपल्या देशाच्या विकासाचे मुख्य आधारस्तंभ बनत आहेत. डॉ. रणजीत चव्हाण यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. डॉ. विनोद चव्हाण यांनी स्थानिक क्षेत्रासाठी बदलत्या वातावरणास तग धरणाऱ्या पीकांच्या विकासामध्ये कृषि जैवतंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यकमाचे सुत्रसंचालन वैष्णवी धांडे तर डॉ. विद्या हिंगे यांनी आभार मानले.




प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी, प्रमुख अतिथी डॉ. उल्हास कदम, जिओसंग राष्ट्रीय विद्यापीठ, जिनजु, दक्षिण कोरिया यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि कृषि जैवतंत्रज्ञानातील करिअरसाठी आवश्यक कौशल्ये आणि निकषांवर प्रकाशझोत टाकला. श्री. अमोल ढवण, एडीएम एग्रो इंडस्ट्रीज, लातूर आणि डॉ. अंजली शर्मा यांनी विनम्रता, संयम आणि सेवा-उदात्त इत्यादी कलागुनाच्या आवश्यकतेवर भर दिला, विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राच्या बदलत्या गरजा आणि त्यांच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याचा सल्ला दिला. डॉ. पुरुषोत्तम झंवर, विद्यार्थी कल्याण अधिकारी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी कृषि जैवतंत्रज्ञानात रोजगार संधी मिळवण्यासाठी कौशल्य विकसित करण्याचे महत्त्व सांगितले.

प्रशिक्षण समन्वयक म्हणून महाविद्यालयाचे अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब ठोंबरे होते, तर डॉ. राहुल चव्हाण, डॉ. विद्या हिंगे आणि डॉ. योगेश भगत प्रशिक्षण सह-समन्वयक म्हणून कार्यरत होते. महाविद्यालयाचे डॉ. सारीका भालेराव, डॉ. भास्कर अगलावे, डॉ. अच्युत भरोसे, डॉ. रमेश ढवळे, डॉ. दीप्ती वानखडे, अभिजीत देशमुख, प्रातिक्षा जाधव, उवैस शेख, आणि किशोर घोळवे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परीश्रम घेतले.

# राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी निवड




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

संभाजीनगर सिद्धार्थ जलतरण तलाव येथे आयोजित विभागीय स्पर्धा पार पडल्या दरम्यान ट्विंकलिंग स्टार स्कूल च्या अथर्व शेळके याने एक मीटर स्प्रिंग बोर्ड तसेच तीन मीटर स्प्रिंग बोर्ड या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत आपले नाव कोरले. पुढील राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा अमरावती येथे होणार आहे. तसेच याच शाळेतील सिद्धी जायभाय या विद्यार्थिनींने १६ ऑक्टोबर २०२४ रोजी एन-३ स्केटिंग रिंग सिडको छत्रपती संभाजीनगर येते आयोजित करण्यात आलेल्या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक चे स्थान पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले.निवडी बदल सर्व स्तरातुन कौतुक केल जात आहे.या यशाबद्दल स्कूल चे चेअरमन गणेश मैड, स्कूल संचालिका शीतल मैड, स्कूल डायरेक्टर कोमाथ भास्करन, प्राचार्या जयश्री कदम, उप प्राचार्य दीपक झा उप प्राचार्य कृष्णाकुमार, परिवेशिका मेरी अलेंझांडर, स्वाती राठोड, क्रीडा शिक्षक अशोक चौरे, दिनेश ढाकणे आदीनी सर्व विजय संघातील खेळाडूंचे अभिनंदन करून कौतुक केले आणि पुढील होणाऱ्या स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# सोयगाव जरंडी मंडळात ढगफुटी

## अस्मानी: शेत शिवारातील पिकं पाण्यात



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव आणि जरंडी या दोन मंडळात शुक्रवारी रात्री नऊ वाजेपासून ते अकरा वाजेपर्यंत दोन तास ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने या मंडळातील २७ गावातील पाण्यात बुडाली आहे दरम्यान शुक्रवारी रात्री जरंडी मंडळात पावसाने सरासरी ९० मी मी विक्रमी नोंद केली आहे तर सोयगाव मंडळात सरासरी ७० मी मी पाऊस झाला आहे त्यामुळे हे दोन्हीं मंडळ ओल्या दुष्काळा च्या छायेखाली असल्याचे महसूलच्या सूत्रांनी सांगितले दरम्यान शनिवारी सोयगाव व जरंडी मंडळात महसूल विभागाने नुकसानीचे पंचनामे हाती घेतले असून शनिवारी तलाठी महेंद्र वारकड यांनी पंचनामे सुरू केले होते

तालुक्यातील सोयगाव आणि जरंडी या दोन्ही मंडळातील २७ गावांना ढगफुटी च्या पावसाने झोडपून काढले दोन तासांच्या पावसात दोनही मंडळातील १२ हजार १२८ हेक्टरवरील कपाशीची पिके पाण्याखाली आली असून या आधीच्या झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पिकांसह उर्वरित पीकही उध्वस्त झाले आहे दोन्ही मंडळात २७ गावे बाधित झाली असून कपाशी व कापणी करून ठेवलेला शेतातील मका पिकांची नुकसान झाले आहे कापूस भिजून काळवंडून गेला तर मक्याच्या पिकांना कोंब फुटली आहे त्यामुळे (ता.३१ ) ऑक्टोबर च्या सुधारित पैसेवारी मध्ये ही दोन्ही मंडळे ओल्या दुष्काळा मध्ये समाविष्ट करण्यासाठी महसूल विभागाच्या हालचाली सुरू झालेल्या आहे त्यासाठी शनिवार पासुन नुकसानी चा जोखीम स्तर व नुकसानीची तीव्रता तपासणीचे काम महसूल व कृषी विभागाने हाती घेतले आहे दरम्यान ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसानी ची आकडेवारी संकलित करण्यात येत असून अद्यापही कृषीच्या पथकांनी संकलित अहवाल तालुका कृषी विभागाकडे सादर झालेला नसून सोमवार पर्यंत हा अहवाल सादर होईल व त्यानंतर प्रस्ताव जिल्हा कृषी अधिकारी यांना सादर करण्यात येणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांनी सांगितले आहे दरम्यान शुक्रवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयगाव ची सोना नदी रात्री दुथडी भरून वाहिली तर जरंडी च्या खडकी नदीला रात्री आलेल्या पुरा नंतर पुन्हा शनिवारी दुपारी तीन वाजता या परिसराला परतीच्या पावसाने झोडपून काढल्याने दुपारी खडकी नदीला मोठा पूर आला होता.

> सोयगाव व परिसराला शुक्रवारी रात्री अतिवृष्टी चा पाऊस झाला आहे दोन्ही मंडळातील तलाठी सज्जा ना पाहणी व नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे सोमवारी पंचनामे अहवाल सादर होईल
> -मनीषा मेने,
> तहसीलदार सोयगाव

# बनोटी उपकेंद्रात वीज पुरवठा खंडित

## समस्या:३२ गावे रात्रभर राहिली अंधारात

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बनोटी उपकेंद्राला जोडणी केलेल्या वीज पुरवठ्याच्या पाचोरा जि जळगाव येथील तारखेडा वीज उपकेंद्रात कंट्रोल रूम मध्ये शुक्रवारी रात्री पाणी शिरल्यामुळे ऊउ बॅटरी चार्जर शॉर्ट झाल्या ने बनोटी उपकेंद्राचा शुक्रवारी सायंकाळी चार वाजेपासून वीज पुरवठा ठप्प झाला आहे त्यामुळे ३२ गावे शुक्रवारी अंधारात होती दरम्यान अद्यापही हा बिघाड दूर झालेला नसल्याने या ३२ गावांचा अंधार दूर झालेला नाही पाचोरा येथील तारखेडा उपकेंद्राचा ऊउ सप्लाय फेल आहे. त्यामुळे नवीन चार्जर आल्याशिवाय ट्रायल घेनार नसल्याचे पाचोरा महावितरण कडून कळविण्यात आले असल्यामुळे तारखेडा उपकेंद्रात नवीन चार्जर बसवल्याशिवाय सोयगाव तालुक्यातील बनोटी ची लाईन सुरु होणार नाही.असे स्पष्ट निर्देश पाचोरा महावितरण कडून काढण्यात आले आहे त्यामुळे तब्बल २८ तासापासून बनोटी सह परिसरात वीज पुरवठा ठप्प झालेला आहे शुक्रवारी रात्रभर व शनिवारी दिवसा असे २८ तास ३२ गावे विजे विना असल्याने नागरिकांची गैरसोय झाली आहे पिठगिरण्या बंद झालेल्या आहे.



**बीड:** जिल्हा गुरुकुल असोसिएशन बैठकीत विचारमंथन करतांना, संघटनेचे अध्यक्ष इंगोले, सचिव तुपे, कोषाध्यक्ष वाघमारे आदी.

# चोराचा छडा लावून मुद्देमाल दिला मिळवून

## वेलडन:संभाजीनगर पोलीस ठाण्याची कामगिरी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बसमध्ये महिलेला गुंगीचे औषध देऊन लुटलेला ऐवज प्रकरणी दोन महिन्यात चोराकडून हस्तगत करून महिलेस परत करण्याची कौतुकास्पद कामगिरी संभाजीनगर पोलिसांनी करून दाखवल्याबद्दल पोलिसांचे कौतुक होत आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी कमल ज्ञानोबा सुरवसे वय ५० वर्ष रा. बसवेश्वर कॉलनी परळी ता. परळी जि.बीड महिला ८ ऑगस्ट परळी बसस्थानक येथून नांदेड येथे जाण्यासाठी बस मधून प्रवास करत असताना बसमध्ये एका अनोळखी इसमाने या महिलेला बिस्कीट आणि पाणी दिले. पाणी पील्यानंतर तिला चक्कर आली. गुंगीत असताना बिस्कीट व पाणी देणाऱ्या अनोळखी इसमाने तिच्या अंगावरील ३ लाख ५० हजार रुपये किंमतीचे दागिने काढून घेवून पोबारा केला. या लुटीच्या घटनेची फिर्याद परळी येथील संभाजीनगर पोलीस ठाण्यात कमल सुरवसे यांनी नोंदवली.

या गुन्ह्याबाबत संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी तपासाची चक्र वेगाने फिरवत या गुन्ह्यातील आरोपी अमोल धोंडीबा मस्के यास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बोधेगाव येथून अटक केली व मुद्देमाल जप्त केला. या तपासकामी अश्या प्रकारच्या गुन्ह्यातील आरोपींची माहिती घेत व शहरातील सी.सी. टी.व्ही कॅमेऱ्याची मदत घेण्यात आली. जप्त करण्यात आलेले ३ लाख ५० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून बुधवार दि१६ ऑक्टोबर रोजी फिर्यादी कमल ज्ञानोबा सुरवसे यांना परत केले. या गुन्ह्याचा वेगाने तपस करीत पोलीस निरीक्षक धनजंय ढोणे, सहायक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव, पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे साहेब, पोह नरहरी नागरगोजे, पोकॉ व्यंकट डोरनाळे, पोकॉ भगवान चव्हाण, पोकॉ. शंकर डोंगळे आदींनी गुन्ह्याचा छडा दोन महिन्यात लावण्याची कामगिरी पार पडली. पोलिसांच्या या कार्यतत्परटेबद्दल परळी येथील संभाजीनगर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे.

# पुस्तके माणसाच्या जीवनाला आकार देतात!

## उपक्रम:वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नेकनूर जि बीड दि. १८ ऑक्टोबर २०23 रोजी भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय विभागा अंतर्गत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा. माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर मध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागा अंतर्गत वाचन प्रेरणा दिनसाजरा करण्यात आला. सर्वप्रथम महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. ढास,डी.के. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ.शंकर वाघमारे नॅक समन्वयक प्रा. डॉ. सलीम एम.एस.व डॉ.ज्योती मगर (ग्रंथपाल ) यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जी अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थिनीने तयार केलेल्या भिंतीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ.शंकर वाघमारे यांनी आपल्या व्याख्यानात डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकून त्यांच्या बालपणापासून शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, राजकीय नेतृत्व यादीवर प्रकाश टाकला तसेच नॅक समन्वयक प्रा. डॉ. सलीम शेख सर यांनी मिसाईल मॅन ते देशाचे राष्ट्रपती हा प्रवास कथन केला.

अध्यक्ष समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांनी डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे व्यक्तिमत्व, त्यांच्या प्रति असणारी सद्भावना तसेच त्यांची निरपेक्ष सेवावृत्ती,अध्यात्मिक दृष्टिकोन वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादी बाबीवर सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ.ज्योती मगर यांनी केले. तर आभार प्रदर्शन आकांक्षा आव्हाड या विद्यार्थिनीने मानले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकत्तेर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## मोहीम : साने गुरुजी निवासी विद्यालयाचा उपक्रम

# स्वच्छता मोहीम राबवून आदर्श निर्माण!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालय केज यांच्या वतीने गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२४-२५अंतर्गत केज तहसील कार्यालय परिसरात दिनांक १८/१०/२०२४ रोजी शुक्रवार सकाळी गावस्वच्छता अभियाना अंतर्गत भवानी चौक ते मेन रोडवरुन स्वच्छता प्रभात फेरी काढून स्वच्छतेचा संदेश देणारे फलक घेऊन स्वच्छते विषयी जनजागृती करण्यात आली तसेच केज तालुक्याची सर्वात जास्त रहदारी आसणिरे केज तालुक्या मोठ्या प्रमाणात वावर आसणा-या केज तहसील कार्यालय या अभियाना अंतर्गत केज तहसील कार्यालय परिसर झाडून कचरा गोळा करून अनावश्यक झाडे झुडपे उपटून कचऱ्याची विल्हेवाट लाऊन सार्वजनिक परिसर स्वच्छ करण्याचा संदेश नागरिकांना या विद्यार्थ्यांनी दिला या स्तुत्य उपक्रमा विषयी केजचे तहसीलदार श्री. राकेश गिड्डे साहेब यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले या प्रसंगी नायब तहसीलदार श्रीमती आशा वाघ मॅडम, केज सज्जाचे तलाठी साहिल इनामदार आदि उपस्थित होते. साने गुरुजी निवासी विद्यालयाने राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाची तहसील परिसरात उपस्थित असणा-या सर्वांनी तोंड भरुन कौतुक केले कर्तव्य दक्ष प्राचार्या डॉ. कविताताई गित्ते/कराड मॅंडम यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी व विद्यार्थी असे स्तुत्य सामाजिक उपक्रम नियमित राबवत असतात नवरात्र उत्सव काळात ही भवानी माळ परिसरात अशीच इक्कोफ्रेंडली स्वच्छता मोहिम राबविले होती या मुळे साने गुरुजी निवासी विद्यालय नेहमिच सामाजिक दायित्व म्हणून विविध सामाजिक उपक्रम राबवत असते आज तहसील परिसरात स्वच्छता करताना श्रीमती सुवर्णा सिरसट,श्री.मोती उत्तम, निलेश तरकसे, पवार ज्ञानेश्वर, मजहर शेख, इंद्रमोहन कराड आदि कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




# हजारो हेक्टर वरील कांदा धोक्यात !

## अस्मानी:पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आठवडाभर सातत्याने सकाळी पडणाऱ्या धुईने नेकनूर परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून हजारो हेक्टरवरील कांदा पीक धोक्यात आले आहे. फवारणी करुनही कांदा उभारी घेण्याची शक्यता नसल्याने यावर नांगर फिरवण्याचा सूर शेतकऱ्यांतुन व्यक्त होत आहे. भाव वाढल्याने यावर्षी उत्पादन क्षेत्र वाढले असताना शेतकऱ्यांसमोर आठवडाभरातील धुईने संकट ओढावले आहे. केज तालुक्यातील नेकनूर परिसरात असणारी बहुतांश गावे कांदा उत्पादक म्हणून ओळखली जातात. यामध्ये नेकनूर, सावंतवाडी, बाळापूर, आंबील, वडगाव, कुंभारी, चाकरवाडी, बंदेवादी, वैतागवाडी, सफेपुर, जैताळवाडी, धावज्याचीवाडी, पांढऱ्याचीवाडी,तांदळयाचीवाडी, नारेवाडी, मुंडेवाडी, वाघेभाबळगाव आदी परिसरातील गावांमध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात कांदा पिकवला जातो. मागील दोन महिन्यांच्या कालावधीत लागवड झालेल्या हजारो हेक्टरवरील कांद्याला जाळ धुईने घेऱ्यात घेतले, त्यामुळे जोमदार दिसणारे कांदा पीक करपले लागोपाठ रोजच आठवडाभर आलेली धुईरुपी विघ्न शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी टाकणारे ठरले. आवश्यक असलेली फवारणी करूनही पाहिजे तेवढा फरक नसल्याने आता यावर नांगर फिरवावा लागेल या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. एलोरा वडर, फुरसुंगी, बसमत ७८० अशा विविध जातीचे बियाणे ते रोप विक्रीचा व्यवसाय या भागात मागच्या दीड, दोन महिन्याच्या काळात वेग धरून असतो. कांद्याने चाळीस रुपयांचा टप्पा पार केल्याने यावर्षी रोपांनी चांगलाच भाव खाल्ला लागवडीचा खर्च वाढला मात्र आठवड्याच्या जाळधुईने शेतकऱ्याचे सगळे गणितच बिघडून टाकले मोठा खर्च करूनही पीक वाया जात असल्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

# गुलाबाच्या या जाती देतील लाखोंचे उत्पन्न

**कलमांची निवड** - लागवडीसाठी स्वतः तयार केलेली कलमे निवडावीत तसेच कलमे निरोगी हव्या. निवडलेले कलम हे ४ ते ६ महिने वयाचे असावे.गुलाबाच्या २० हजारांहून जास्त जाती लागवडीखाली आहेत तरी योग्य जात निवडावी. आपल्या हवामानात आणि जमिनीत चांगली वाढणारी, आकर्षक तसेच दर्जेदार फुलांचे उत्पादन देणारी जात निवड करावी. ग्लॅडिएटर, रक्तगंधा, अर्जुन, सुपरस्टार, लेडी एक्स, पापा मिलन, ब्लू मून, डबल डिलाइट, पॅराडाइज, ख्रिश्चन डायर, ओक्लोहोमा, अमेरिका हेरिटेज, लॅंडोस, पीस या जातींना बाजारात मोठी मागणी आहे.

**जातींची विभागणी** - हायब्रिड टी : लांब दांड्याच्या फुलासाठी याची लागवड करतात.एका फांदीवर १ ते ३ लांब दांड्याची फुले येतात.

या प्रकारातील फुले मोठी, आकर्षक, काही दुहेरी रंगाची असतात. यामध्ये गॅडिएटर, सुपरस्टार, डबल डिलाईट, पीस, ॲम्बेसॅडर, ब्लू मून, फस्ट प्राईज, पापा मिलन, समर सनशाईन, लॅंडोरा, डॉ. होमी भाभा या जातींचा समावेश होतो.

**बागेत लावण्यासाठी** - जास्त फुले देण्याची क्षमता असलेल्या फ्लोरीबंडा, मिनिएचर व हायब्रीड टी प्रकारातील



काही जातींची निवड करावी. बागेत लागवडीसाठी जोमदार वाढणाऱ्या, आकर्षक रंगाची जास्त फुले असलेल्या, जास्त काळापर्य पास्ता, कोरोना, डॅनिश गोल्ड, रॉबिनसन, ऑल गोल्ड, युरोपिआना. सजावटीसाठी - पाकळ्यांची विशिष्ट ठेवण असलेल्या फुलांचा आकर्षक आकार, रंग व सुवास असलेल्या, पाने तजेलदार व दांडा लांब असलेल्या या जाती असतात, त्याची व्यापारी तत्त्वावर लागवडही करतात. ग्लॅडिएटर, सोनिया, रक्तगंधा, अर्जुन, डबल डिलाईट, लॅंडोरा, टिकाने, सुपरस्टार, इलोनी, मर्सडिस, पापा मिलन, लेडी एक्स, ब्लू मून या जाती सजावटीसाठी वापरल्या जातात.

**फ्लोरीबंडा :** या प्रकाराची फुले मध्यम आकाराची आणि झुपक्यात येतात. फुले हायब्रीड टी पेक्षा ही पिके आकाराने लहान असतात.यामध्ये बंजारन, ऑल गोल्ड, चंद्रमा, डिअरेस्ट, दिल्ली प्रिन्सेस, सिटी ऑफ लखनौ, इन्डीपेन्डन्स, समर स्नो, नीलांबरी, प्रेमा, हिमांगिनी या जाती आहेत.

**पॉलिएन्था** : मध्यम उंचीच्या झाडाला एकेरी लहान, पसरट पण झुपक ?याने फुले लागतात.कुंडीत, परसबागेत, कुंपणासाठी लागवड करण्यास हा प्रकार उपयोगी असतो. यामध्ये शॉवर, एको, बेबीरेड, बेबीव्हाईट, प्रीती याजाती येतात.

**मिनिएचर्स** : यास छोटा गुलाब असे म्हणतात. लहान झाडाची पानेही लहान असतात.याला लहान फुले झुपक्याने येतात. याची झाडे काटक असतात. कमी जागेत किंवा कुंड्यात लागवडीसाठी उपयुक्त.या प्रकारात पिक्सी, बेबी गोल्डस्टार, रोझ मरीन, किंग यलो डोल, स्वीट फेअर, ड्वार्फ किंग इत्यादी जाती आहेत.

**बाजारात बाराही महिने गुलाबाची मोठी मागणी असते. प्रत्येक लग्नसमारंभ असो किंवा वाढदिवस, सभा, गणपती सणवार अशा अनेक कार्यक्रमासाठी गुलाबाची मोठ्या प्रमाणावर मागणी होत असते . वॅलेंटिने डे ला तर गुलाबाला उचांकी दर मिळत असतो. गुलकंद, अत्तर, गुलाबजल यासाठी देखील गुलाबाच्या फुलांची वापर होत असतो. जगभरात होणाऱ्या फुलांच्या उलाढालीमध्ये एकट्या गुलाबाचा वाटा ३५ ते ४० टक्के आहे . गुलाब फुलांची शेती हा शेतकऱ्यांसाठी एक उत्तम पर्याय असू शकतो. गुलाब लागवडीसाठी जमीन कशी असावी - गुलाब लागवडीसाठी जमीन हि मध्यम स्वरूपाची असावी जेणेकरून अतिपाऊस झाला तरी पाण्याचा निचरा झाला होईल .जमिनीचा सामू हा ६ ते ७.५ असायला पाहिजे .गुलाब हे झुडूप वर्गीय असल्याने एकदा लागवड केल्यानंतर ५ ते ६ वर्ष टिकते .गुलाब हे बाराही महिने येणारे पीक आहे त्यामुळे तुम्ही केव्हाही त्याची लागवड करू शकता .पावसाच्या पाण्याच्या उपलब्धीनुसार जानेवारी -फेब्रुवारी किंवा जुने -जुलै मध्ये लागवड करू शकता.**

**रंगानुसार जातीचे वर्गीकरण -**

लाल - ग्लॅडिएटर, ख्रिश ?चन डायर, रक्तगंधा, रेड मास्टर पीस, ओन्ली लव्ह

गुलाबी - फ्रेंडशिप, फर्स्ट प्राईज, मारिया क्लास

पिवळा - लॅंडोरा, समर सनशाईन, गोल्डन टाइम्स, माबेल्ला

निळा/जांभळा - लेडी एक्स, ब्लू मून, पॅराडाईज

केशरी - समर हॉलिडे, सुपरस्टार, प्रिन्सेस

पांढरा - ऑनर, व्हिर्गो, जॉन एफ. केनेडी, मॅटर हार्न

दुरंगी - लव्ह, हार्टसमन

बहुरंगी - डबल डिलाईट, पीस, [illegible]

**खत व्यवस्थापन :** गुलाबाच्या उत्तम वाढीसाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी १० ग्रॅम युरिया, एक महिन्यानंतर १० ग्रॅम डी.ए.पी. आणि दोन महिन्यानंतर २ ग्रॅम मॅग्नेशियम सल्फेट द्यावे.दुसऱ्या वर्षापासून गुलाबाला हेक ?टरी ५० टन शेणखत, १२०० किलो युरिया, २४०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ६५० किलो सल्फेट ऑफ पोटॅश द्यावे.जून महिन्यात संपूर्ण स्फुरद, अर्धे शेणखत तसेच १/४ नत्र आणि १/४ पालाश या खताची मात्रा द्यावी. राहिले सोबत १/४ नत्र व अर्धी पालाशची मात्रा द्यावी. पीक संरक्षण -


भुरी, करपा, खोडकूज, पानेकूज, काळे ठिपके हे गुलाब पिकावरील प्रमुख रोग आहेत.

भुरी - भुरी रोगामुळे पानांवर बुरशीचा पांढरा थर निर्माण होवुन तो पुढे कळ्या व फुलांवर पसरतो. दिवसा जास्त तापमान व रात्री खूप थंडी तसेच धुके यामुळे रोगाचा प्रसार होतो.

करपा - गुलाबाच्या पानावर छोटे-छोटे काळे ठिपके पडतात. कालांतराने ते वाढत जाऊन पाने पिवळी पडून गळून जातात.

किडींचा प्रादुर्भाव - प्रामुख्याने लाल कोळी, पांढरी माशी, मावा, फुलकिडे, पाने खाणारी अळी, कळी पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होतो.

# कोरडवाहू रब्बी पिकांचे व्यवस्थापन



**जमिनीची निवड, मशागत व ओलावा**

कोरडवाहू पिकासाठी मध्यम ते भारी, पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडाची. खरिपातील मूग व उडीद यांचे पीक काढल्यानंतर वखराच्या सहाय्याने उताराला आडची मशागत करावी. त्यामुळे पावसाचे पिकांची वाढ व उत्पादनासाठी होईल. सोयाबीन काढल्यानंतर जमिनीची मशागत करून पेरणी केल्यास ओलाव्याच्या अभावामुळे पिकांची उगवण कमी होते.

अति उथळ जमिनीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता कमी असल्याने रब्बी हंगामात कोणतेही पीक घेणे या जमिनीवर फायदेशीर राहत नाही. मध्यम खोल आणि खोल जमिनीसाठी खरीप पिकाबरोबर रब्बी पिके तसेच आंतरपीक पद्धती आणि दुबार पीक पद्धतीचा अवलंब करावा.

**पिकांच्या लागवडीची सूत्रे**

**रब्बी ज्वारी :** पेरणीपूर्व एक महिना मध्यम ते भारी जमिनीमध्ये बळीराम नांगराने उताराला आडव्या सऱ्या काढून पावसाचे पाणी जमिनीत मुरवावे. जमिनीच्या प्रकारानुसार मालदांडी-३५-१, ज्योती, एस.पी.व्ही.- ८३९, एस.पी.व्ही.-६५५, यशोदा, परभणी मोती या वाणांचा वापर हेक्टरी १० किलो बियाणे पेरावे व खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी वेळेवर पेरणी करून बियाण्थाला ३५ टक्के थायोमिथोक्झॅम ५ ग्रॅम प्रतिकिलो चोळून बीजप्रक्रिया करावी. कोणी रोगाच्या प्रतिबंधासाठी ३०० मेष गंधक ४ ग्रॅम प्रति केलिो या प्रमाणात बियाण्याला चोळून वापर करावा. ओलाव्यासाठी दोन ओळींतील अंतर ४५ सेंमी. (१८ इंच) करावे. विरळणी पहिल्या २० दिवसांत करून दोन रौपांतील अंतर १५ ते १७ सॅमी. ठेवावे. हेक्टरी ताटांची संख्या १ लाख ३५ हजार ठेवावी.

**जमीन व पिके: मध्यम जमीन :** सूर्यफूल, करडई मध्यम खोल जमीन : रब्बी ज्वारी, करडई, हरभरा, रब्बी ज्वारी- करडई, करडई - हरभरा.

**खोल जमीन :** रब्बी ज्वारी, करडई, हरभरा ही सलग पिके करडई, हरभरा या दुबार पीक पद्धती घ्याव्यात.

**सरी काढून पेरणी :** यामध्ये प्रामुख्याने खरीप हंगामात ४ अथवा ६ ओळींनंतर सरी काढणे, रुंद वरंबा-सरी पद्धतीचा अवलंब करणे हे जमीन आणि पाणी संवर्धनासाठी महत्त्वाचे आहे. या तंत्राने पावसाचे पाणी जमिनीत मोठ्या प्रमाणात साठविलें जाते. त्यामुळे रब्बी पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते. पेरणीपूर्व एक महिना मध्यम ते भारी, ४५ सेंमी. खोल जमिनीवर ४५ सेंमी. ठेवून सऱ्या काढन्यात. योग्य ओलावा असताना तिफणीच्या सहाय्याने पेरणी करावी.

सरीमध्ये पेरणी केल्यानंतर रासणी करू नये. यामुळे सप्टेंबर-ऑक्टोबरमधील पावसाचे पाणी जमिनीत मुरून पिकाला ओलाचा उपलब्ध होतो. सोयाबीन या पिकांमधील तणांचा बंदोबस्त योग्य वेळी केल्यास जमिनीमध्ये दीर्घ काळ ओलाचा टिकून रब्बी हंगामातील दुबार पिकाचे उत्पादन अधिक मिळते. रब्बीसाठी मृदा संधारण, सुधारित जातींची निवड, वेळेवर मशागत व पेरणी, तणांचा ओलावा, आपत्कालीन पीक योजनांचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे.

सिंचनाची सोय असल्यास पीक पोटरीत असताना किंवा फुलोऱ्यात असताना किंवा कणसात दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी दिल्यास उत्पादनात भरघोस चाढ़ होते.खोडमाशी, माचा, चिकटा इ. प्रादुर्भाव आढळल्यास शिफारशीनुसार कीटकनाशकांच्या फवारण्था कराव्थात.

**हरभरा :** जमिनीच्या प्रकारानुसार विजय, आकाश, विशाल, विराट, बीडीएन९३. जी-१२, आयसीसीन्ही-२ या जाती पेराव्यात. कोरडवाहू परिस्थितीमध्ये हरभऱ्याची पेरणी सप्टेंबरचा तिसरा आठवडा ते १५ ऑक्टोबरपर्यंत करावी. हेक्टरी ६० ते ६५ केलिी बियाणे वापरावे.

हरभरा मध्ये मर रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्व प्रतिकेलिी ३ ग्रॅम किंवा २ ग्रॅम कार्बेडझिम किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा चोळावे. त्यानंतर रायझोबियम व पीएसबी हे जिवाणुसंवर्धक बियाण्यास चोळावे. हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद पेरताना खोल पेरून द्यावे.

पीक तीन आठवड्यांचे झाल्यावर १० ते १५ दिवसांच्या अंतराने ३ कोळपण्या कराव्यात. हरभरा पिकास २ टक्के डीएपी (२०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) किंवा २ टक्के युरिया द्रावणाची पहिली फवारणी फुले येण्यापूर्वी आणि त्यानंतर १० ते १२ दिवसांनी दुसरी फवारणी केल्यास दाणे चांगले भरुन उत्पादनात वाढ होते.

हरभ-याला घाटे भरण्याच्या अवस्थेत १ टका १३.०.४५ (पोटॅशियम नायट्रेट)ची फवारणी करावी.

घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी दिल्यास उत्पादनात २८ टक्के वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच दोन पाणी उपलब्ध असल्यास पहिले पाणी फुलोरा अवस्था व दुसरे पाणी घाटे भरण्याच्या अवस्थेत दिल्यास उत्पादनात ५२ टक्के वाढ होते. घाटेअळीचा बंदोबस्त अळी लहान असतानाच एकात्मिक कोड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा.

**करडई :** जमिनीच्या प्रकारानुसार पीबीएनएस- १२, भीमा, शारदा, तारा, अनेगिरी या जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ केलिी बीजप्रक्रिया केलेलं बियाणे वापरावे. पेरणी १८ २० सेंमी. अंतरावर करावी.

ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरावड्यात पेरणी करावी. करडईमध्ये मर रोगापासून संरक्षणासाठी पेरणीपूर्व प्रतिकिलो बियाण्याला ३ ग्रॅम किंवा २ ग्रॅम कार्बँडझिम किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा चोळावे. त्यानंतर ॲसेटोबॅक्टर व पीएसबी जिवाणुसंवर्धक बियाण्याला चोळावे.

हेक्टरी ४० किलो नत्र आणि २० किलो स्फुरदबियाणे पेरताना खोल पेरुन द्यावे. पीक तीन आठवड्यांचे झाल्यावर १० ते १२ दिवसांच्या अंतराने कोळपण्था कराव्यात. पाण्याची उपलब्धता असल्यास सोंडओळ पद्धतीने किंवा रुंद वरंबा पद्धतीने पाणी द्यावे. जमिनीत पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी. पिकाला बाल्यावस्था, फुलोरावस्था तसेच बोंड भरण्याच्या वेळी पाणी द्यावे. - करडईवर मावा प्रादुर्भाच मोठ्या प्रमाणात होतो. त्यासाठी डायमिथोएट ३० ईसी. ७५० मिलि/हे. ५०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**कोरडवाहू आंतरपीक पद्धती :** रब्बी हंगामात आपत्कालीन परिस्थितीत एक पीक नष्ट झाले, तरी दुस-या पिकापासून उत्पादन मिळण्यासाठी सलग पिकाऐवजी सुधारित पीक पद्धतीचा अवलंब केल्यास उत्पादनात स्थिरता राहते.

**रब्बी ज्वारी अधिक करडई :** ही आंतरपीक पद्धती, ज्या क्षेत्रात रब्बी जवारी मोठ्या प्रमाणात घेतली जाते अशा क्षेत्रासाठी शिफारस करण्थात आली आहे. वातावरणातील उष्ण तापमानातील तफावतीमुळे ज्वारी अथवा करडई सलग पिकातील येणारी घट आंतरपीक पद्धतीत कमी होऊन उत्पादनात स्थिरता येते ही आंतरपीक पद्धत ज्वारी : करडई (६:३) या ओळींच्या प्रमाणात शिफारस केलेली आहे.

**करडई अधिक हरभरा :** मध्यम ते भारी जमिनीसाठी या आंतरपीक पद्धतीची शिफारस करण्यात आली आहे. ४:२ अथवा ६:३ ओळींच्या प्रमाणात ही आंतरपीक पद्धती घेतल्यास जास्त फायदा होतो.

**जवस अधिक हरभरा :** मध्यम ते भारी जमिनीसाठी या आंतरपीक पद्धतीची शिफारस करण्यात आलेली आहे. ६:३ अथवा ३:३ ओळींच्या प्रमाणात ही आंतरपीक पद्धत घेतल्यास जास्त फायदा होतो. याप्रकारे वरील दर्शविलेल्या सर्व तंत्रांचा शेतक-यांनी अवलंब केल्यास कोरड़वाहू रब्बी पीक उत्पादनात वाढ़ होईल .

**प्रा.संजय बाबासाहेब बडे सहाय्यक प्राध्यापक**
कृषि विद्या विभाग दादासाहेब पाटील कृषि महाविद्यालय दहेगाव तालुका वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे कार्यरत आहेत.

# पेरूची फलदायी लागवड!

**शेती करताना भाजीपाला किंवा नगदी पिके घेण्याबरोबरच हवामान, जमिनीचा अंदाज घेत आता अनेक शेतकरी फळ लागवडीकडे वळत आहेत. यामध्ये सुरुवातीला आंबा, केळी, द्राक्षाकडे ओढ असलेला शेतकरी मोटा होता. पण आता त्यासोबत पपई, डाळिंब आणि पेरू लागवडीकडेही मोठ्या प्रमाणात शेतकरी वळत आहेत. मुबलक उत्पादन आणि विक्रीची हमी यामुळे शेतकरी पेरूला पसंती देत आहेत. बागेची उत्तम लागवड, जोपासना केल्यावर हे फळ शेतकऱ्यांना चांगले पैसे देऊ लागले आहे. मानवी शरीराला आवश्यक घटक असलेले फायबर, व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात उपलब्ध असलेले फळ आणि तेही गोड असूनही रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करणारे फळ पेरू मानले जाते. पेरू हंगामी फळ असले, तरी बाजारात मागणीही असते. अलीकडच्या काळात बदलत्या वातावरणामुळे द्राक्ष, डाळिंब ही पिके बेभरवशाची बनली असताना पेरू लागवडीकडे शेतकरीवर्ग वळू लागला आहे.**

पेरूची लागवड नोव्हेंबर आणि डिसेंबर महिनावगळता वर्षातील दहा महिने कधीही करू शकता. जमिनीची आखणी करून ६ बाय ६ मीटर अंतरावर ६० बाय ६० बाय ६० सेंमी आकाराचे खड्डे घ्यावेत. हे खड्डे भरताना १५ ते २० किलो चांगले कुजलेले शेणखत ५०० ग्रॅम, सिंगल सुपर फॉस्फेट ५ ग्रॅम, फोलिडोल पावडर आणि माती यांच्या मिश्रणाने खड्डे भरून घ्यावेत आणि त्यात रोपांची लागवड करावी. जवळपास १ एकरमध्ये २ हजार झाडांची लागवडदेखील होते. पेरू बागेसाठी उष्ण आणि कोरडे हवामान अनुकूल मानले जाते. त्याच्या आदर्श उत्पादनासाठी १५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. पेरूचे झाड कोरडे हवामान सहज सहन करते. पेरूचे रोप अगदी सहज तयार करता येते आणि हवामानातील चढ-उतारांचा त्यावर फारसा परिणाम होत नाही. ज्या ठिकाणी पाण्याची अत्यंत कमतरता आहे त्या ठिकाणीदेखील हे पेरूचे पीक व्यवस्थित येते.

**पेरूच्या सुधारित जाती**

'लखनऊ ४९' ही पेरूची संपूर्ण भारतात उत्पादित होणारी एक प्रगत आणि सुधारित जात आहे. या जातीचे झाड आकाराने लहान असते. या जातीचा पेरू मात्र खूपच गोड असतो. साहजिकच बाजारात याला मोठी मागणी आहे. याशिवाय बाजारपेठेची अधिक पसंती असलेला तैवान पेरू, श्वेता पेरू, थाई पेरू, चविष्ट अलाहाबाद सफेद, पंत प्रभात अशा प्रमुख जाती आहेत. यांपैकी एखादी जात निवडू शकता. प्रत्येक जातीचे वेगवेगळे वैशिष्ट्य आहे.

**पिकावरील रोग व कीड नियंत्रण**

पिकावर प्रामुख्याने फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येतो. याच्या नियंत्रणासाठी रक्षक सापळ्याचा वापर करावा. फळकुज रोगाच्या नियंत्रणासाठी बुरशीनाशकाची फवारणी करावी. फळांवरील डागांसाठी तज्ज्ञांच्या सल्ल्याने औषधफवारणी करावी. रोगग्रस्त फळे व फांद्या बागेच्या बाहेर नेऊन जाळून टाकाव्यात व बागेत हवा खेळती राहील, अशी मोकळीकता ठेवावी.

हरितक्रांतीनंतर भारतात मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा उदय झाला. याचा उपयोग करून शेतकऱ्यांनी विविध पिकांत प्रतिएकर उत्पादन वाढवले. याचाच परिणाम, भारत अन्नधान्य, फळे, भाजीपाला याबाबतीत खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर झाला. एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतीतील उत्पादन व प्रतिएकर उत्पादकता वाढली, पण दुसरीकडे गेल्या दोन दशकांचा विचार केल्यास वाढलेले तापमान, पावसाची अनिश्चितता इत्यादी हवामानात झालेले बदल, याला आपण ग्लोबल वॉर्मिंगच म्हणू शकतो व दुसरीकडे रासायनिक खतांचा जास्त वापर झाल्याने बिघडलेली मातीची प्रत. थोडक्यात, परिस्थितीनुरूप झालेले बदल आणि तंत्रज्ञान वापरातील बिघडलेला समतोल यामुळे आज शेती करताना शेतकऱ्याला या दुहेरी संकटाचा सामना करावा लागतो. हवामान आणि समतोल तंत्रज्ञान यासोबतच महत्त्वाचे आहे ते उत्पादित मालाला चांगला भाव मिळणे. चांगला भाव मिळावा यासाठी क्वालिटी माल तयार करणे,



ही महत्त्वाची एक पायरी असते. हवामानातील बदलानुसार योग्य नियोजन, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर आणि उत्तम बाजारभाव या तीन गोष्टी व्यवस्थित जुळून आल्या, तर शेतकरी स्वतःच्या शेतीत यशस्वी होऊ शकतो.

भारतात पेरू उत्पादनात महाराष्ट्र एक महत्त्वाचे राज्य आहे. त्यात महाराष्ट्रात पेरू उत्पादनातील महत्त्वाचा भाग म्हणजे पुणे जिल्ह्यातील निमगाव केतकी. या भागात मोठ्या प्रमाणात पेरूची लागवड केली जाते. येथील पेरू मोठ्या प्रमाणात निर्यात होतो. वर नमूद केल्याप्रमाणे, आज शेती किंवा फळे बागायती करताना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामध्ये हवामानातील बदलानुसार योग्य ते नियोजन करणे, माती व्यवस्थापन आणि त्यालाच संलग्न खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, रोग - कीड व्यवस्थापन, मार्केटचा योग्य अभ्यास करून त्यानुसार बहार व्यवस्थापन इत्यादी घटकांचा समावेश होतो. वरील सर्व गोष्टींचे योग्य नियोजन करून निमगाव केतकी येथील सुनील भोंग या पेरू बागायतदार शेतकऱ्याने नेचर केअर फर्टिलायझर्सच्या मदतीने विक्रमी पेरू उत्पादन घेऊन स्वतःची एक यशोगाथाच लिहिली आहे आणि शेती क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे.

श्री. भोंग हे गेल्या चार वर्षांपासून पेरूचे उत्पादन घेतात. पेरू पिकाचे सरासरी प्रतिएकर उत्पादन २५ ते ३० टन निघते. परंतु चालू वर्षी त्यांनी पेरूचे प्रतिएकर तब्बल ४० टन एवढे उत्पादन घेतले आहे. या सगळ्यांत त्यांना साथ मिळाली ती नेचर केअर फर्टिलायझर्सच्या ग्रीन हार्वेस्ट स्पेशल, पॉलीफॉस्फेट व जैविक खतांची. गेली तीन वर्षे ते बागेत सातत्याने ग्रीन हार्वेस्ट स्पेशलचा वापर करत आहेत. ग्रीन हार्वेस्ट स्पेशल हे एक पेंडीयुक्त व जीवजिवाणूने समृद्ध असे सेंद्रिय खत असून, त्याच्या सातत्यपूर्ण वापराने त्यांच्या शेतात आमूलाग्र असे बदल झालेले दिसून आले. मातीचे भौतिक, जैविक आणि रासायनिक गुणधर्म सुधारले. अन्नद्रव्य उपलब्धता वाढून एकात्मिक खत व्यवस्थापन करत असताना, रासायनिक खतांचा वापर कमी झाला. माती सुपीक झाल्याने, कमीत कमी म्हणजे खत व्यवस्थापनाच्या फक्त २० टक्के रासायनिक खते देऊन अन्नद्रव्य उपलब्धता चांगली झाली. त्याचसोबत ग्रीन हार्वेस्ट स्पेशलमध्ये असलेल्या विविध मित्र बुरशीमुळे पेरू पिकात शेतकऱ्याची डोकेदुखी ठरणारे व खर्च वाढविणारे सूत्रकृमी व मिली बग यावर १०० टक्के नियंत्रण मिळवता आले. यामुळे रोग कीड व्यवस्थापनामधील खर्चात बचत झाली आहे. एकूण खर्चाचा विचार केल्यास, पेरूमध्ये खते, औषधे यांचा प्रतिएकर खर्च अंदाजे दीड लाख येतो. परंतु, ग्रीन हार्वेस्ट स्पेशलच्या सातत्यपूर्ण वापरामुळे या खर्चात जवळपास २० ते २५ टक्के बचत होऊन तो खर्च साधारण एक लाख दहा हजारांवर सीमित राहिला आहे. यासोबतच, नेचर केअरच्या पॉलीफॉस्फेट खतांचा देखील सातत्याने वापर केल्यामुळे नत्र, स्फुरद व पालाशची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर झाली. साधारणतः जमिनीत दिलेली विद्राव्य खते पिकाला लागू पडतातच असे नाही. बऱ्याच प्रमाणात त्यांचे जमिनीत स्थिरीकरण झालेले असते. ही स्थिर झालेली खते पुन्हा उपलब्ध करून देण्याचे काम पॉलीफॉस्फेट गटातील खतांमार्फत होते. त्यामुळे रासायनिक खतांचे प्रमाण कमी द्यावे लागते. त्यामुळे श्री. भोंग यांना इतर कोणतीही नत्र, स्फुरद, पालाशयुक्त विद्राव्य खते वापरावी लागली नाहीत. अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि रोग कीड नियंत्रण चांगले झाल्याने उत्पादित मालाला उत्तम गुणवत्ता आहे. आज श्री. सुनील भोंग यांच्या शेतात प्रतिझाड सरासरी २५० फळे आहेत. प्रतिफळाचे वजन साधारण ४०० ते ५०० ग्रॅम इतके आहे. म्हणजे सरासरी ८० ते १०० किलो एवढा माल निघणार आहे.

# व्यापारी तत्वावर करा तुळस लागवड

**तुळशीचा उपयोगः** तुळषीच्या पानाच्या रसाचे थेंब कानदुखीवर कानात टाकतात आणि नायटे व इतर चर्मरोगांवर बाहेरून लावतात.पाने कफ काढुन टाकणारी, त्याचा रस घाम आणणारा व पाळीच्या तापावर उपयुक्त असून उत्तेजक व ष्वसनलीका दाह कमी करणारा आहे.वाळलेल्या पानाचे चुर्ण पडसे आले असता तपकीरी प्रमाणे ओढतात.बिया मुत्र रोग विकारावर व जनेंद्रीयाच्या काही विकारावर गुणकारी असतात.तुळषीचा उपयोग उंदराच्या, मगरीच्या, विंचवाच्या व सर्पाच्या विशावर करतात.पानांचा काढा घेतल्यास पोटातील गॅस नाहीसे होतात.

**रासायनिक घटकः** तुळषीच्या पानांत ०.५ ते ०.७ टक्के पिवळे जर्द किंचीत लवंगेसारख्या वासाची बाश्पनषील तेल असते.कृश्ण तुळषीच्या तेलात प्रामुख्याने युजेनॉल हे रासायनिक घटकद्रव्य असते.

**कृष्ण तुळसः** हि सर्व परिचीत औषधी वनस्पती मऊ, केसाळ, षाखायुक्त, ३० ते ७५ से.मी.उंच असून भारतात सर्वत्र आढळते.पाने साधी, लांबट गोल, अखंड किंवा दातेरी व दोन्ही बाजूस लवदार असतात.बी गोलसर, थोडे चपटे, गुळगुळीत, फिक्कट भूरे किंवा तांबूस असते हि जात औशधी म्हणून अतिषय उपयुक्त आहे हि अनेक धार्मिक विधीत पुजेकरीता वापरली जाते.

**हवामान व जमीनः** उश्ण व समषितोश्ण हवामान या वनस्पतीच्या वाढीस अनूकुल असते.जास्त धुके व ढगाळ हवामान असणाछया प्रदेषात या तुळषीची लागवड करू नये. मध्यम काळी, पोयटयाची व उत्तम निचरा होणारी जमीन लागवडीयोग्य असते.

**पुर्व मषागतः** जमीन उभी आडवी नांगरून, कुळवाच्या २-३ पाळया देवून जमीन भुसभुषीत करावी. षेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी १०-२० टण कुजलेले षेणखत वापरावे.लागवडीसाठी ४५-६० से.मी.अंतरावर सरी वरंबे किंवा योग्य आकाराचे सपाट वाफे तयार करावेत.

लागवड पद्धतः तुळषीची लागवड खरीप हंगामात रोपे तयार करून किंवा पेरून करावी. सिंचनाची सोय असल्यास वर्शभर लागवड करता येते.७५-२५० ग्रॅम बियाणे प्रती हेक्टरी लागते.बी लहान असल्याने वाळूत मिसळून १ गु ३ से.मी.आकाराच्या गादी वाफ्यावर पेरणी करावी.बियांची उगवण १० ते १५ दिवसांनी होते.बियांची उगवण होईपर्यंत ८ ते १० दिवस झारीने दररोज पाणी द्यावे त्यानंतर १ दिवसाआड पाटाने हलके पाणी द्यावे.रोपांची १५ ते २० से.मी.वाढ झाल्यानंतर पहिली खुरपनी करावी नंतर तयार झालेल्या रोपांची ६० गु ३० से.मी.किंवा ४५ गु ३० से.मी.अंतरावर सरी वरंब्यावर पुर्नलागवड करावी.लागवडीच्यावेळी प्रती हेक्टरी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ३० किलो पालाष द्यावे व लगेच पाणी द्यावे.प्रत्येक कापणीनंतर हेक्टरी ३० किलो नत्र द्यावे.गरजेप्रमाणे खुरपनी करून पिक तणमुक्त ठेवावे.

**तुळसवर्गीय वनस्पतीच्या एकुण १६० प्रजाती आहेत त्यामध्ये स्वीट बासील, फ्रेंच बासील, कॉमन बासील, मीट बासील, किंवा स्पाईस बासील व होली बासील असे विविध प्रकार पडतात यापैकी भारतात खालील ५ प्रमुख प्रजाती सापडतात त्या पुढीलप्रमाणे.१) रामतुळस २) रानतुळस ३) कृश्णतुळस ४) काली तुलसी, ५) सब्जा तुळस इत्यादी. याषिवाय कापूर तुळस हि जात परदेषातून भारतात लागवड करण्यासाठी आणली असून कापूर उत्पादनासाठी तिची लागवड करण्यात येते वरील सर्व प्रजातीचा उपयोग औशधे व सुगंधी तेल निर्मीतीसाठी केला जातो.**



**पाणी व्यवस्थापनः** पाण्याचा ताण सहन करण्याची या वनस्पतीत क्षमता आहे.पावसाळयात या पिकास पाणी देण्याची गरज भासत नाही मात्र हिवाळयात व उन्हाळयात पिकाच्या गरजेनूसार पाणी द्यावे.

**काढणी व उत्पादनः** पहिली कापणी पिक फुलोछयात असतांना जमीनीपासून २० ते २५ से.मी.अंतरावर करावी.कापणी झाल्यावर लगेचच खते व पाणी द्यावी नंतरच्या दोन कापण्या ७५ ते ९० दिवसाच्या अंतराने कराव्यात.कापणी केल्यावर संपूर्ण ओले पिक सावलीत वाळवावे म्हणजे त्यातील ओलावा कमी होवून तेलाचे प्रमाण वाढते.प्रती हेक्टरी १५ ते २५ टण पाने, मंजिरी, फांद्या मिळतात व त्यापासून १०० ते ११० किलो सुगंधी तेलाचे उत्पादन मिळते.

**बाजारभावः** पाने, फुले १० ते २० रू प्रती किलो, सुगंधी तेल ३०० ते ५०० रूपये प्रतीकिलो हा बाजारभाव मार्केटमधील आवकनूसार बदलू षकतो.



## सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

## दोन्ही मुली सज्ञान, त्या आपल्या मर्जीने आश्रमात राहतात

# ईशा फाऊंडेशनवरची कारवाई रद्द!

**नवी दिल्लीः** सद्गुरू जग्गा वासुदेव यांच्या ईशा फाऊंडेशनला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने फाऊंडेशनविरोधात उच्च न्यायालयात सुरू असलेली कारवाई रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयाचा परिणाम केवळ याच प्रकरणासाठी सीमित राहील असेही न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने सांगितले की, मद्रास उच्च न्यायालयासाठी अशा प्रकरच्या याचिकेवर तपासाचे आदेश देणे योग्य नव्हते. वडिलांनी केलेली याचिका चुकीची आहे. दोन्ही मुली सज्ञान आहेत आणि त्या आपल्या मर्जीने आश्रमात राहत आहेत.

निवृत्त प्रोफेसर एस कामराज यांनी ईशा फाऊंडेशनविरोधात मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. लता आणि गीता या त्यांच्या मुलींना आश्रमात ओलीस ठेवण्यात आल्याचा आरोपी कामराज यांनी केला होता. त्यांच्या याच याचिकेवर उच्च न्यायालयाने ३० सप्टेंबर रोजी ईशा फाऊंडेशनशी संबंधित सर्व गुन्हेगारीसंबंधित प्रकरणाची माहिती मागितली होती. १ ऑक्टोबर रोजी १०० हून अधिक पोलीस कर्मचारी फाऊंडेशनच्या मुख्यालयात पोहोचले होते. त्यावेळी सद्गुरूंनी मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावर आज न्यायालयात सुनावणी पार पडली.

### ईशा फाऊंडेशनमध्ये हेबियस कॉर्पससंबंधित प्रकरण

पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, ईशा फाऊंडेशनमध्ये गेल्या काही वर्षात बेपत्ता आणि आत्महत्येसंबंधित तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी पुढे सांगितले की, हेबियस कॉर्पस प्रकरणात कथित बंदी आपल्या मर्जीने योगा केंद्रात राहत होत्या. प्रतिज्ञापत्रात दिल्यानुसार, गेल्या १५ वर्षात ईशा फाऊंडेशनच्या अधिकार क्षेत्रात अलंदुरई पोलीस ठाण्यात बेपत्ताची सहा प्रकरणे दाखल आहेत. यातील सहाव्या प्रकरणाचा तपास सुरू आहे. बेपत्ता झालेली व्यक्ती अद्याप सापडलेली नाही.

# आरएसएसच्या खीर वाटप कार्यक्रमात १० जण जखमी

वृत्तसंस्था

**जयपूर :** करणी विहार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रजनी विहारमध्ये गुरुवारी रात्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) शरद पौर्णिमा कार्यक्रमांतर्गत खीर वाटप सुरू असताना काही तरुणांनी चाकू हल्ला केला. चाकू हल्ल्यात दहा जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी जखमींना एसएमएस हॉस्पिटलमध्ये पाठवले, तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

रजनी विहारमध्ये आरएसएस शाखेतर्फे शरद पौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, खीर वाटप करत असलेल्या लोकांवर एका तरुणाने चाकूने हल्ला करून खीर फेकली, त्यामुळे कार्यक्रमात गोंधळ उडाला. यावेळी काही लोकांनी हल्लेखोरांना पकडले. या घटनेनंतर अनेकांनी करणी विहार पोलीस ठाणे गाठून आरोपींना अटक करण्याची मागणी केली. याप्रकरणी नसीब चौधरी आणि त्यांच्या मुलाला ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करण्यात येत आहे. मंत्री राज्यवर्धन सिंह राठोड, आमदार गोपाल शर्मा, भाजप नेते अरुण चतुर्वेदी यांनी सवाई मानसिंग रुग्णालयात जखमींची भेट घेतली. रात्री उशिरा पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरात अतिरिक्त फौजफाटा तैनात करून या गुन्ह्यात सहभागी असलेल्या अन्य तरुणांचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम सुरू केली होती.

# पुतीनच्या निमंत्रणावरून मोदी दुसऱ्यांदा रशियाला जाणार

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** पंतप्रधान नरेंद्र मोदी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या निमंत्रणावरून २२-२३ ऑक्टोबर २०२४ रोजी रशियाला भेट देणार आहेत. रशियाच्या अध्यक्षतेखाली कझान येथे होणाऱ्या १६ व्या ब्रिक्स परिषदेत ते सहभागी होणार आहेत. ब्रिक्स परिषदेत पीएम मोदी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासह संघटनेच्या इतर राष्ट्रप्रमुखांनाही भेटण्याची शक्यता आहे. भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या संदर्भातील माहिती दिल्याचे वृत्त 'ऋ' वृत्तसंस्थेने दिले आहे.

रशिया यंदा ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवत आहे. ब्रिक्समध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा समावेश आहे. एवढेच नाही तर सौदी अरेबिया, इराण, इथियोपिया, इजिप्त, अर्जेंटिना आणि संयुक्त अरब अमिराती हे त्याचे नवीन सदस्य आहेत.



अशा परिस्थितीत पीएम मोदी त्या सर्व देशांच्या नेत्यांची भेट घेऊ शकतात. त्यामुळे पीएम मोदींचा हा दोन दिवसांचा दौरा महत्त्वाचा ठरू शकतो. पीएम मोदी याच वर्षी ८ जुलै रोजी दोन दिवसांसाठी रशियाला गेले होते. त्या दरम्यान पीएम मोदींना रशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यू द अपॉस्टलने सन्मानित करण्यात आले होते. ब्रिक्सच्या महत्त्वाविषयी बोलताना, हे प्रमुख जागतिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ प्रदान करेल.

# आसाममध्ये एक्स्प्रेसचे आठ डबे घसरले; दिबालाँग स्टेशनवरील दुर्घटना

**गुवाहाटी :** आगरतळा-लोकमान्य टिळक टर्मिनल एक्स्प्रेसचे आठ डबे रुळावरून घसरल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. आसाममधील दिमा हासाओ येथील दिबालाँग स्टेशनवर आज गुरूवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, रेल्वे पोलीस तसेच आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले आहेत. दरम्यान, या अपघाताच्या कारणांचा शोध घेत असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, आगरतळा-



लोकमान्य टिळक टर्मिनल एक्स्प्रेस गुरूवारी सकाळी आगरतळा येथून निघाली होती. ती दुपारी चारच्या सुमारास लुमडिंग-बर्दरपूर हिल भागात पोहोचली. याठिकाणी अचानक या इंजिनसह एक्स्प्रेसचे आठ डबे रुळावरून घसरले. सुदैवाने गाडीचा वेग कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली. यासंदर्भात रेल्वे अधिकारी म्हणाले, दुपारी ४ वाजताच्या सुमारास दिबालाँग स्टेशनजवळ आगरतळा-लोकमान्य टिळक टर्मिनल एक्स्प्रेसचे आठ डबे रुळावरून घसरले.

# किडनी रुग्णांना मिळणार मोफत उपचार!

देशोन्नती वृत्तसंकलन

**चंदीगड :** नायबसिंग सैनी यांनी हरियाणाच्या मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांनी अध्यक्षपदी विराजमान होताच मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी राज्यातील जनतेला मोठी देणगी दिली आहे. पदभार स्वीकारल्यानंतर सीएम सैनी यांनी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये किडनीच्या रुग्णांसाठी मोफत डायलिसिसची घोषणा केली. भविष्यात सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मोफत डायलिसिसची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नायबसिंग सैनी काल दुसऱ्यांदा हरियाणाचे मुख्यमंत्री झाले. सीएम सैनी यांच्यासह १३ आमदारांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली. यापूर्वी १२ मार्च २०२४

### नायबसिंग सैनींचा मोठा निर्णय



रोजी ते प्रथमच हरियाणाचे मुख्यमंत्री म्हणून निवडून आले होते. यावेळी भाजपने हरियाणात पूर्ण बहुमताने सरकार स्थापन केले आहे. सीएम सैनी म्हणाले, आमच्या सरकारने गेल्या दहा वर्षांत खूप काम केले आहे. विरोधकांनी नरेटीव्ह सेट केला पण सर्वसामान्यांनी ते मोडीत काढले. शेतकऱ्यांना भडकवण्याचे काम करण्यात आले. तरुणांना अविश्वासाच्या दरीत ढकलण्याचे काम विरोधकांनी केले.'

रोजगाराच्या मुद्यावर सैनी म्हणाले की, 'आज मीही यात जॉइन झालो आहे. राज्यातील पंचवीस हजार तरुणही नव्या नोकऱ्यांमध्ये रुजू झाले आहेत. गुन्हेगारांनी एकतर गुन्हा सोडावा, नाही तर गुन्हेगारांनी हरियाणा सोडावे, अन्यथा त्यांना सोडले जाणार नाही,' असा इशारा मुख्यमंत्री नायब सैनी यांनी दिला. यावेळी भाजपने हरियाणात ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. हरियाणात भाजपने सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन केले आहे. गेली १० वर्षे सत्तेत असलेल्या भाजपने हरियाणात ४८ जागा जिंकल्या आहेत. तर काँग्रेसला ३७ जागा मिळाल्या. इंडियन नॅशनल लोकदलाला काल तीन जागा मिळाल्या, सैनी सरकारच्या शपथविधी सोहळ्याला पीएम मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह, जेपी नड्डा यांच्यासह अनेक एनडीए नेते उपस्थित होते.

# जस्टीन ट्रूडो यांच्याविरोधात खासदारांची आघाडी

**ओटावा :** कॅनडाचे नेते जस्टीन ट्रूडो यांच्या विरोधात त्यांच्याच पक्षाच्या खासदारांनी आघाडी उघडली आहे. ट्रूडो यांनी नेतेपदाचा राजीनामा देणे हे प्राप्त परिस्थितीत योग्य ठरेल असे प्रतिपादन करत या खासदारांनी त्यांना नेतेपदावरून हटविण्याची मागणी केली आहे. २० खासदारांनी लेखी स्वरुपात ट्रूडो यांच्या राजीनाम्याची मागणी करण्याची तयारी दर्शविली आहे. ट्रूडो यांच्यामुळे पक्षाला हानी होत आहे. त्यांची विश्वासार्हता कमी झाली असून आता त्यांनी पद सोडणेच पक्षाच्या भवितव्यासाठी योग्य ठरेल असे या खासदारांनी स्पष्टपणे खडसावले आहे. भारतावर केलेल्या आरोपांमुळे जस्टीन ट्रूडो सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

# १५ वर्षीय मुलगी मुलासोबत 'फरार'

## घरच्यांसह पोलिसांची डोकेदुखी वाढली

देशोन्नती वृत्तसंकलन

**नोएडा :** नोएडा येथील एका १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीने घरच्यांची आणि पोलिसांची डोकेदुखी वाढवली आहे. घरा शेजारी राहणाऱ्या एका १२ वर्षांच्या मुलासोबत ही मुलगी फरार झाली आहे. या पूर्वी दोन वेळा ही मुलगी या मुलासोबत पळून गेली होती. मात्र, पोलिसांनी दोन्ही वेळेला मुलीचा व मुलाचा शोध घेऊन तिला परत पालकांच्या स्वाधीन केले होते. मात्र, पुन्हा ही मुलगी मुलासोबत फरार झाली आहे.

नोएडाच्या सेक्टर ५८ मधील बिशनपुरा गावात ही घटना घडली. मुलीच्या वाईट सवयीमुळे कुटुंब नोएडा सोडून बिहारला जाण्याच्या तयारीत असताना अल्पवयीन मुलगी ही घरातून पळून गेली. वडील रिक्षा नेण्यासाठी बाहेर गेले असताना यावेळी आई आणि लहान बहिणीला चकवा देऊन ती घरातून गायब झाली. शेजारी राहणारा १२ वर्षांचा मुलगादेखील घरातून बेपत्ता आहे. त्यामुळे मुलीच्या कुटुंबीयांनी पुन्हा एकदा पोलिसांत धाव घेतली असून या मुलीचा शोध घेण्यासाठी पुन्हा एकदा पोलीस गुंतले आहेत. मूळचा बिहारच्या दरभंगा जिल्ह्याचा रहिवासी असलेल्या तिच्या वडिलांनी सांगितले की, त्याला दोन मुली आहेत. मोठी मुलगी १५ वर्षांची तर धाकटी मुलगी १२ वर्षांची आहे.



**कोल्हापूर :** दोनवडे फाटा-साबळेवाडी रोडवर विटभट्टीजवळ स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने शस्त्र विक्रीसाठी आलेल्या संशयिताला ताब्यात घेऊन गावठी बनावटीचे पिस्टल, ३ जिवंत काडतुसे हस्तगत केली. कृष्णा सुरेश कलकुटगी (३८) असे त्याचे नाव आहे. गुरुवारी ही कारवाई करण्यात आली.

# विद्यार्थ्याच्या मोबाइलमध्ये सापडले 4000 व्हिडिओ


## विक्री करताना घेतले ताब्यात

**गोरखपुर :** उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातून समोर आलेल्या एका प्रकरणाने सर्वांचीच झोप उडवली आहे. येथे इयत्ता ११ वीत शिकणाऱ्या अवघ्या १७ वर्षीय विद्यार्थ्याच्या मोबाईलमध्ये ४००० हून अधिक 'चाइल्ड पोर्नोग्राफीक' व्हिडिओचे कलेक्शन सापडले असून अशा व्हिडिओची विक्री करताना त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार या विद्यार्थ्याने हे व्हिडिओ टेलिग्रामवर अश्लील कंटेंटचे पेज चालवणाऱ्याकडून विकत घेतले होते. या कलेक्शनमधील व्हिडिओची हा मुलगा ३० टक्के कमिशन घेत विकत होता. एकूणच या प्रकाराने गोरखपूर जिल्हा हादरला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या घटनेत लक्ष घातले असून, याप्रकरणी आता सायबर सेल कसोशीने तपास करत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार गोरखपूरमधील सायबर पोलिसांना एका एनजीओकडून मुलांशी संबंधित अश्लील साहित्याच्या विक्रीबाबत माहिती मिळाली होती. या प्रकरणाच्या तपासादरम्यान, १७ वर्षीय अल्पवयीन मुलाची सोशल मीडियावरील ॲक्टिविटी ट्रॅक करण्यात आली.

# डीजेसमोर नाचताना 13 वर्षीय मुलाचा मृत्यू

**भोपाळ :** मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथे डीजेसमोर नाचताना एका १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. समर बिलोरे असे या मुलाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलाच्या घरासमोरून दुर्गामूर्ती घेऊन जात असताना त्याने डीजेसमोर नाचायला सुरुवात केली; परंतु, तो अचानक जमिनीवर कोसळला आणि त्याचा मृत्यू झाला. दुर्गामूर्ती विसर्जन मिरवणुकीत प्रचंड गर्दी आणि मोठा आवाज असल्याने लोकांचे समरकडे लक्ष गेले नाही. मृताच्या आईने आपला मुलगा जमिनीवर पडल्याचे पाहून मदतीसाठी आरडाओरडा केला. त्यानंतर हा प्रकार उजेडात आला. मृत मुलाला हृदयाशी संबंधित आजार होता; परंतु, आता तो बरा होता, असेही त्याच्या आईने सांगितले. या घटनेबाबत सांगताना समरचे वडील म्हणाले की, डीजेचा आवाज खूप मोठा होता. अनेकदा बोलूनही डीजे थांबला नाही.



# कुलगुरूंना घेराव घालताच नोकरभरती स्थगित

**पणजी :** गोवा फॉरवर्ड पार्टीचे सरचिटणीस प्रशांत नाईक यांनी गुरुवारी पक्षाच्या अन्य नेत्यांच्या शिष्टमंडळासह गोवा विद्यापीठाच्या नोकर भरतीसंदर्भात १५ वर्षांच्या गोव्यातील अधिवासाची अट शिथिल करणारी जाहिरात जारी केल्याबद्दल कुलगुरू हरिलाल मेनन यांना घेराव घालून जाब विचारला. गोवा फॉरवर्डच्या आणि विद्यार्थ्यांच्या मागणीवरून कुलगुरूंनी नियोजित पदांसाठीच्या मुलाखती थांबविण्याचे आश्वासन दिले आहे.

# भारतातील लाखो लोक होतील आंधळे!

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** डोळे हा शरीराच्या सर्वात महत्त्वाच्या अवयवांपैकी एक आहे. जर त्यांचा प्रकाश हिरावला गेला तर ते त्यांच्या आयुष्याची कल्पनाही करायला घाबरतात, भारतातील कोट्यवधी लोक संकटाचा सामना करत आहेत. डोळ्यांच्या अत्यंत गंभीर आजारांवरही उत्तम उपचार करण्यासाठी देशात रुग्णालयांची एक मोठी साखळी असूनही, येत्या काही वर्षांत लाखो लोक


देशातील सर्वात मोठ्या नेत्र रुग्णालयांपैकी एक असलेल्या ऋप्रसाद नेत्र संस्थेचे संस्थापक डॉ. गुल्लापल्ली नागेश्वर राव म्हणतात की भारतात कॉर्निया प्रत्यारोपणाची गंभीर कमतरता आहे. रुग्णांची संख्या आणि प्रत्यारोपणाच्या सुविधांमधील ही तफावत सातत्याने वाढत आहे. डोळ्यांची दृष्टी पूर्ववत करण्यासाठी उपचार उपलब्ध असूनही देशातील लाखो लोक आपली दृष्टी गमावत आहेत. डॉ. राव म्हणाले,

### कॉर्निया प्रत्यारोपण अंधत्वाचे मोठे कारण

डोळ्यांचे अनेक आजार आहेत ज्यामध्ये दृष्टी गेली आहे, जरी आपण ती आकडेवारी विचारात घेतली नाही, तर कॉर्निया प्रत्यारोपण करण्यास असमर्थता हे एकच कारण अंधत्वाचे इतके मोठे कारण समोर येत आहे. केंद्र आणि राज्य सरकार, सार्वजनिक आणि खासगी आरोग्य यंत्रणांना याकडे लक्ष द्यावे लागेल, असे डॉ. राव म्हणाले. सन २०३० पर्यंत कॉर्नियल प्रत्यारोपणाची संख्या ३० हजारांवरून किमान ६० हजारांपर्यंत वाढवावी लागेल. आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करणाऱ्या देशात किमान ५० ।बँका उघडाव्यात.

अंधत्वाच्या आहारी जाणार आहेत. अशीच परिस्थिती राहिली तर देशात उपचार उपलब्ध असूनही या लोकांना त्यांची दृष्टी परत मिळू

### अपुरी पडतेय आरोग्य यंत्रणा



शकणार नाही. देशभरातील आरोग्य यंत्रणेची क्षमता सध्या केवळ ३० हजार कॉर्निया प्रत्यारोपणाची आहे. त्यामुळे दरवर्षी सुमारे ७० हजार लोकांना कॉर्निया प्रत्यारोपणाशिवाय अंध राहावे लागते.


# भारताच्या कारवाईला चीन-पाकिस्तानचा विरोध

## एससीओच्या परिषदेत केला विरोध

वृत्तसंस्था...

**इस्लामाबाद :** जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवल्याचा अप्रत्यक्ष संदर्भ देत चीन आणि पाकिस्तानने भारताच्या या एकतर्फी कारवाईला शांघाय सहकार्य संघटनेच्या अर्थात एससीओच्या परिषदेत विरोध केला आहे. तसेच हा प्रश्न संबंधित आंतरराष्ट्रीय कायदे आणि द्विपक्षीय करारांनुसार सोडवला जावा असेही सांगितले.

पाकिस्तानने जम्मू आणि



काश्मीरमधील परिस्थितीतील ताज्या घडामोडींची चीनला माहिती दिली, तर चीनने पुनरुच्चार केला की जम्मू आणि काश्मीर वाद हा इतिहासाचा एक भाग आहे आणि तो संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर, संबंधित संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा ठराव आणि द्विपक्षीय करारांनुसार योग्यरित्या आणि शांततेने सोडवला गेला पाहिजे.

# ठोस पुरावे नाहीत, केवळ माहितीच्या आधारे आरोप

## पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांची कबुली

वृत्तसंस्था...

**ओटावा :** कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी मान्य केले की गेल्या वर्षी खलिस्तानी फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमध्ये भारत सरकारच्या एजंटांचा सहभाग असल्याचा आरोप करताना त्यांच्याकडे केवळ गुप्तचर माहिती होती आणि कोणतेही ठोस पुरावे नाहीत. मात्र, फेडरल निवडणूक प्रक्रिया आणि लोकशाही संस्थांमध्ये परकीय हस्तक्षेपाची चौकशी करणाऱ्या स्वतंत्र आयोगासमोर साक्ष देताना ट्रूडो यांनी दावा केला की भारतीय मुत्सद्दी नरेंद्र मोदी सरकारला विरोध करणाऱ्या कॅनेडियन लोकांची माहिती गोळा करत आहेत. हे मुत्सद्दी ही माहिती भारत सरकारच्या उच्च स्तरावर आणि लॉरेन्स बिश्नोई टोळीसारख्या गुन्हेगारी संघटनांपर्यंत पोहोचवत होते.




निज्जर हत्या प्रकरणात कॅनडाने भारताला कोणतेही पुरावे दिले नसल्याचे यापूर्वी भारताने अनेकवेळा स्पष्ट केले होते.

# याह्या सिनवारचा इस्त्राईलकडून खात्मा

## इस्रायल संरक्षण दलांनी केली पुष्टी

वृत्तसंस्था

**गाझा :** इस्रायल आणि हमास यांच्यात गेल्या अनेक महिन्यांपासून युद्ध सुरू आहे. या संघर्षात इस्रायलला मोठे यश मिळाल्याची माहिती समोर आली आहे. इस्रायली सैन्याने हमास प्रमुख याह्या सिनवारला अखेर ठार केले आहे. इस्रायलचे परराष्ट्र मंत्री इस्रायल कॅट्झ यांनी १७ ऑक्टोबर रोजी हमास प्रमुख याह्या सिनवारला इस्रायल संरक्षण दलांनी ठार केल्याची पुष्टी केली आहे. आयडीएफच्या माहितीनुसार, इस्रायलने गाझात केलेल्या हल्ल्यात हमासचे ३ दहशतवादी मारले गेले, ज्यात याह्या सिनवार याचाही समावेश होता. डीएनए चाचणीतून याची पुष्टी झाली आहे. तसेच, इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनीही याबाबत दुजोरा दिला आहे. सिनवार हा इस्रायलवर ऑक्टोबर २०१४ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड आणि हमासचा प्रमुख होता.




# पेट्रामध्ये प्राचीन कबरीसह बारा सांगाड्यांचा शोध

## अल खजनेह इथे सापडली कबर

वृत्तसंस्था

**लंडन :** जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणाऱ्या जॉर्डनमधील पेट्रा येथे पुरातत्त्व संशोधकांना उत्खननात एक कबर आढळून आली. ही कबर जागतिक वारसास्थळ असणाऱ्या ट्रेजरी इमारतीच्या अल खजनेह इथे सापडली. तिथे १२ सांगाडेही आढळले आहेत. तसेच काही प्राचीन भांड्यांचे अवशेषही इथे आढळले. याच ठिकाणी इंडियाना जोन्स अँड द लास्ट क्रुसेड यासारख्या चित्रपटांचे शूटिंगही झाले होते.

पेट्रा हे एक प्राचीन शहर



असून, वाळवंटातील दऱ्या-खोऱ्यांमध्ये खडकांवर हातांनी कोरीव काम करून शहर वसवण्यात आल्याचे संदर्भ आढळतात. राकेमे अशी या शहराची स्थानिकांमध्ये असणारी ओळख. व्यापाराच्या निमित्ताने स्थलांतर करणाऱ्या आणि नाबातियन अरब समुदायाने साधारण इसवीसन पूर्व पाचव्या शतकात हे शहर वसवल्याचे सांगितले जाते.

# परळी पालिकेने लावला शंभर कोटींना चुना!

**राजेभाऊ फड** उच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका





परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी नगर पालिकेकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. परळी नगर पालिकेने जनतेची गैर कायदेशीर मार्गाने जवळपास १०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. वास्तविक पाहता अशा स्वरूपाचा कर घेण्याबाबत कुठलेही आदेश नाहीत किंवा कुठलाही शासन आदेश नाही. मालमत्ता करापोटी शासन नियमानुसार भरलेल्या पैशांपेक्षा एक टक्का अतिरिक्त शुल्क नगर पालिकेकडून वसूल केले जात आहेत. हा प्रकार नियमबाह्य असून, हेच पैसे जनतेला परत करा व यापुढे असा कर वसूल केला जाऊ नये अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात पुढील सुनावणी येत्या २७ तारखेला ठेवण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,परळी वैजनाथ नगरपरिषद परळी वैजनाथ या कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज दाखल केल्या नंतर सदरील मालमत्तेच्या नावाची नोंदणी प्रमाणपत्र देते वेळी अनाधिकृतपणे कर आकाराला जातो व शहरातील नागरिकांवर त्याचा विनाकारण भुर्दंड पडतो. अशा प्रकारचा कर आकारण्याची कोणताही तरतूद नगरपरिषद कायद्यामध्ये, नियमा मध्ये व शासन निर्णयामध्ये नसतानाही सामान्य नागरिकांना वेठीस धरून अशा प्रकारची कर वसुली परळी नगरपरिषद कार्यालयामार्फत केली जाते अन्यथा त्यांच्या मालमत्तेची नोंद नगरपरिषद कार्यालयामध्ये घेतली जात नाही. नाइलाजास्तव परळी शहरातील नागरिकांना इच्छा नसतानाही कर भरावा लागतो. सदरील कराबद्दल राजेभाऊ श्रीराम फड यांनी वेळोवेळी मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदरील कराबद्दलची माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली शेवटी दिनांक २४/०६/२०२४ रोजी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरील कराबद्दल माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असता मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद यांनी सदरील कराबाबत माहिती दिली नाही व वर्षानुवर्षे अशा प्रकारचें अनाधिकृतपणे कर वसुली करत आहेत.याबाबत राजेभाऊ श्रीराम फड यांनी मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अँडव्होकेट श्री यावलकर व अँडव्होकेट श्री नागरगोजे यांच्या मार्फत याचिका दाखल केली. सदरील याचिकेमध्ये मा न्यायालयास विनंती केली कि

पान २ वर...

# बायकोनेकडून नवऱ्याला जाळून मारण्याचा प्रयत्न !

घटना:अंगावर टाकले पेट्रोल,पळून गेल्याने वाचला जीव




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

नवऱ्या पासून विभक्त राहत असलेल्या पत्नीने तिच्या प्रॉपर्टीच्या वादातून स्वतःच्या नवऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याची खबळजनक घटना घडली आहे. या बाबतची माहिती अशी की, केज येथील पान मटेरीयलचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यक्तीची पत्नी ही एक वर्षापासुन त्याच्या पासून विभक्त राहत आहे. या दोघांमध्ये प्रॉपर्टीचा वाद सुरु असून तिचे अन्य एका व्यक्तीसोबत अनैतिक प्रेम सबंध आहेत.शिवीगाळ, चाकुहल्ला करुन केले जखमी १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:०० वा. च्या सुमारास तिचा नवरा हा त्याच्या पान मटेरियलच्या दुकानावर असताना त्याची पत्नी आणि मुलगी यांच्या सोबत विशाल दत्तात्रय मस्के आणि बाबा पठाण हे दुकानावर आले. त्याची पत्नी त्याला शिवीगाळ करु लागली. तेव्हा तो दुकानाचे बाहेर आला असता, विशाल दत्तात्रय मस्के, बाबा पठाण व त्याची मुलगी यांनी त्याला पकडले आणि पत्नीने तिच्या बॅगे मध्ये आणलेली पेट्रोलची बाटली त्याच्या अंगावर ओतली. काडी ओढुन नवऱ्याच्या अंगावर टाकत असतांना तो झटापट करुन तेथुन पळून गेला. त्यानंतर तो पोलीस ठाण्याकडे पळून जात असताना रस्त्यात एका सलुनचे दुकाना समोर उभे असलेल्या निखील समुद्रे, सुरज नाईकवाडे, करण हजारे यांनी त्याला

पान २ वर...

# माकप निवडणूक रिंगणात उभा!

**घाडगे :** माजलगाव, परळी मतदार संघात तयारी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थी, युवक, शेतकरी व कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी माकप परळी वै व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन निवडणुक लढविणार आहे. सत्ताधारी व विरोधक जनतेच्या प्रश्नां ऐवजी भावनिक प्रश्न पुढे करीत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांत माकप निवडणुक लढविणार असल्याची माहिती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कमिटी सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी दिली आहे.

केंद्रात व राज्यात सत्तेत असलेल्या सरकारने शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नाची सोडवणुक करण्या ऐवजी प्रश्न वाढले आहेत. युवकांच्या हाताला काम नाही. मतदारांमध्ये विद्यमान सरकार विषयी चिड निर्माण झालेली आहे. राज्यात धर्म व जातीयवादावर निवडणुक लढविली जात आहे. जनतेच्या प्रश्नांना जाणीवपूर्वक दुर्लक्षीत केले जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष निवडणुक लढविणार आहे. भाजपच्या सरकार चा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडी सोबत माकप सामंजस्याची भुमिका घेत आहे. माकप बीड जिल्हा समिती ने

पान २ वर...

# परळीत शेतकरी संवाद यात्रेला प्रतिसाद

**सुनील गुट्टे:**परळी मतदार संघात बेरोजगारी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे वतीने शेतकरी संवाद यात्रा काढण्यात आली होती. मतदार संघात ७०० किलोमीटरचा प्रवास करून या यात्रेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. विधानसभा मतदारसंघात प्रचंड बेरोजगारी वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. सर्वत्र दहशत निर्माण झाल्याने जनता सर्वच विकासात्मक पातळीवर फेल ठरणाऱ्या पालकमंत्र्यांना पराभूत केल्याशिवाय राहणार नाही असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते सुनील भैया गुट्टे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पुढे बोलताना सुनील भैया गुट्टे म्हणाले की, शेतकरी संवाद यात्रेच्या निमित्ताने परळी विधानसभा मतदारसंघातील अंबाजोगाई व परळी तालुक्यातील १६० गावांना जाऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधता आला.या संवादाच्या माध्यमातून मतदार संघातील बिकट प्रश्नांची जाणीव झाली. पैसे दिल्याशिवाय परळी तालुक्यात घरकुल मंजूर होत नाही. तसेच एकाच घरात तीन–तीन विहिरी मंजूर झाल्याचे हे लोकांनी सांगितले. सोयाबीनला १२ वर्षांपूर्वी चार हजार रुपये क्विंटल भाव होता तर आजही २०२४ मध्ये शेतकऱ्यांच्या सोयाबीनला ४ हजार रुपयेच भाव मिळत आहे. २०१९ मध्ये विद्यमान कृषी मंत्री आणि पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी लोकांना जाहीरनामाच्या माध्यमातून जे आश्वासने दिली होती त्यातील फक्त दहा टक्केच कामे झाल्याचेही गुट्टे यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जेष्ठ नेत्या सौ. सुदामतीताई गुट्टे व शेतकरी नेते कालिदास आपेट यांच्या मार्गदर्शनाखाली, युवानेते सुनील भैया गुट्टे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांचा सुसंवाद करण्यासाठी शेतकरी संवाद यात्रेचे मतदारसंघात दोन टप्प्यात आयोजन करण्यात आले होते. या शेतकरी संवाद यात्रे दरम्यान पहिल्या टप्यानध्ये ९ दिवस ८८ गाद

पान २ वर...

# तिटकारा असलेल्यांना जागा दाखवू

**सवाल:**आ.नमितांना मराठा समाजाची एवढी ऍलर्जी का?




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार नमीताताई मुंदडा यांना मराठा समाजाने निवडणून दीले नाही का भगवान गडावर उपस्थित राहील्या पन नारायण गडावर उपस्थित राहील्या नाहीत तसेच माजी आमदार नमीताताई मुंदडा यांनी विद्यमान आमदार असताना मराठा आरक्षणाला विरोध केला आहे तसेच यापुढे ही माजी आमदार नमीता मुंदडा यांचा मराठा आरक्षणाला विरोध असणार आहे यात मराठा समाज बांधवांनी शंका बाळगू नये त्यामुळे माजी आमदार नमीताताई मुंदडा यांना मतदारांनी मतदान करताना आपल्या मुलाबाळांचा विचार करून माजी आमदार नमीताताई मुंदडा यांना निवडून मतदान करावे अन्यथा माजी

पान २ वर...

# अनेक इच्छुकांच्या तिकीटासाठी रंगा!

**चित्र:** उमेदवारी जाहीर नसताना उंबरठे झिजवू लागले




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

निवडणूक घटीका आता समीप आली आहे. अनेक जण इच्छुक उमेदवार अगदी देव पाण्यात घालून तिकिट वाटपाच्या रांगेत जणूकाही प्रसादाच्या रांगेत उभे आहेत अशी प्रतीक्षा करत आहेत. गावोगाव जाऊन पंक्तीचे आश्वासन देऊन आले आहेत. आणि आता मतदारांनाही उमेदवारांपेक्षा भलतीच लगीनघाई झाल्याचे दिसून येत असून प्रत्येक जण आपापल्या परीने अंदाज वर्तवण्यामध्ये मशगुल झालेले आहेत. केज विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक इच्छुक उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून बोहल्यावर चढण्याच्या तयारीत आहेत. मात्र मंडपाची तयारी अद्याप सुरु असून पुन्हा लग्न घटी समीप आली आहे आणि आता आपण बोहोल्यावर चढा असे म्हणणारे अद्यापही मौन बाळगून आहेत. मागच्या दोन–तीन महिन्यांपासून इच्छुकांनी साज चढवलेला आहे आणि गावागावात, वाड्या वस्त्यांवर जाऊन आश्वासनांची खैरात वाटलेली आहे. आश्वासन म्हटलं की भविष्यकाळ असे म्हणतात आणि अशी आश्वासने कित्येक इच्छुकांनी दिलेले आहेत. आश्वासने दिल्यानंतर वऱ्हाडी मतदारही वऱ्हाड्याप्रमाणे कोण बोहल्यावर चढणार आहे या उत्सुकतेमध्ये आहे. मात्र प्रत्येक पक्षाकडे जागा एकच, त्यामुळे कोण किती मानपान करतो आणि कोण दिलेल्या आश्वासनाच्या पंक्तीमध्ये शेवटपर्यंत तग धरतो यावरच त्याला बोहल्यावर चढण्याची संधी मिळणार आहे. आता जवळजवळ सर्व तयारी झाली असून केवळ इच्छुकांच्या यादीमधून एकाची निवड करण्याचे मोठे काम वरिष्ठांना करावे लागणार आहे. मात्र कुठल्याही एकाची निवड करणं हे एवढं सोपं काम नाही. त्यामुळे सर्वांनाच

पान २ वर...

# नगरमध्ये अंतयात्रेला मोफत निर्वाण रथ

**माणूसकी:**तथागत बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचा उपक्रम




नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक जाणीव ठेवून तथागत बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया अहमदनगर या संस्थेच्या वतीने अहमदनगर शहर भिंगार शहर अंत्यविधीसाठी रथाची मोफत सुविधा उपलब्ध करून दिली आहे गोरगरीब कष्टकरी समाजातील सर्वांनाच आपल्या कुटुंबातील सदस्यांसाठी अंत्यसंस्कार करण्यासाठी रथाची व्यवस्था होत नाही समाजातील गोरगरीब कष्टकरी यांच्या कडे विधी साठी पैसे सुध्दा नसतात काही ठिकाणी तर खांदा देणा–यासाठी कोणी ही पुढे येत नाही शहराच्या आसपास आमधाम याचे अंतर लांब असते आणि जर गरिब कुंटबाचे जर अंतविधी आसेल तर त्यांना फार आडचणीला सामोरे

पान २ वर...

# शेतकऱ्यांच्या हितासाठी खटाऱ्याला मते द्या

**ॲड. नारायण गोले:**माजलगाव मतदार संघात दौरा



माजलगाव/प्रतिनिधी गेल्या दहा वर्षात शेतकरी प्रचंड व्यतीत झाला असून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या हमीभावासह दैनंदिन महागाई, बि–बियाण्यांच्या वाढत्या किमती, खते औषधे यांच्यात येणारी वाढती भेसळ, आणि साखर कारखानदाराकडून होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी म्हणजेच शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या खटाऱ्याला मते देण्याचे आवाहन भाई ड नारायण गोले पाटील यांनी सुरुमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथे कॉर्नर सभेत बोलताना केले.

कृषीप्रधान देशात शेतकरी दुर्लक्षित असून गेल्या ७० वर्षात शेतकऱ्याच्या शेतमालाला कीफायातशिर हमीभाव देणारा कायदा राज्यात आणि केंद्रात शासन करू शकलेले नाही याशिवाय शेतकऱ्यांच्या शेतमालाला लागणारे बी – बियाणे, खते, औषधे, वीज व इतर उपयुक्त साधने यांच्या किमती दिवसेंदिवस भरमसाठ वाढत असताना गेल्या साठ वर्षात काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप, शिवसेनेसह सर्वच प्रस्थापित पक्ष आणि प्रस्थापित राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना व सामान्य नागरिकांना लुटण्याचे पाप केले असून या प्रस्थापित राजकीय पक्षांना आणि प्रस्थापित राजकीय पुढार्यांना धडा शिकवण्याची वेळ आलेली असून शेतकऱ्यांसाठी, कामगारासाठी,कष्टकऱ्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून सातत्याने आक्रमकपणे आणि प्रामाणिकपणे लढणारा शेतकरी कामगार पक्षाचा लालबावटा आजही त्याच उमेदीने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढतो आहे, शेतकरी कामगार पक्षांचा आवाज बुलंद करण्यासाठी व भाई एन डी पाटील, भाई गणपतराव देशमुख,क्रांतीसिंह नाना पाटील,या महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या चळवळी जिवंत ठेवण्यासाठी

पान २ वर...

**प्रशासन सज्ज** परळीमध्ये मतदार जनजागृती

# निवडणूक विभागाकडून जागृती रॅली




भगवान साकसमुद्रे/परळी

आज दिनांक १९ ऑक्टोंबर शनिवार रोजी सकाळी ठीक ८:३० वाजता परळी –२३३ विधानसभा मतदारसंघात निवडणूक विभागाच्या वतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती रॅली परिसरात संपन्न झाली.या रॅलीमध्ये २३३ परळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर , परळी विधानसभा मतदारसंघ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या आदेशानुसार व उपस्थितीत परळी शहरामध्ये अनेक भागातून सायकल रॅलीच्या माध्यमातून ङतएएझ विभागा अंतर्गत मतदार जनजागृती करण्यात आली.

याप्रसंगी अरविंद लाटकर यांनी सर्व मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही मतदान करण्यासाठी सहभागी करावे असे आवाहन करण्यात आले. व व्यंकटेश मुंडे यांनी मतदार जनजागृती साठी सर्वांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले.या रॅली मध्ये प्रामुख्याने नगरपरिषदचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे , नायब तहसीलदार बाबुराव रुपनर , कालिदास बडे , बाल विकास प्रकल्प अधिकारी दराडे , ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी हिना अन्सारी, नगर परिषद चे उपमुख्यधिकारी संतोष रोडे , तसेच ङतएएझ ढए–च् चे गोविंद कराड , शाम अघाव, सुरेखा नागरगोजे, जया इगे,रेखा कोळपकर, अनिता भारती, श्री नंदकिशोर जातकर, महेश जाधव,इम्रान सय्यद, शाम कुलकर्णी विविध शाळांचे मुख्याध्यापक प्राचार्य तसेच विविध विभागातील अधिकारी कर्मचारी पोलीस प्रशासनातील अधिकारी कर्मचारी,विद्यार्थी, शहरातील मतदार, पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ...तर महायुतीतुन बाहेर पडावे

**भास्कर रोडे:**मंत्री रामदास आठवलेंची भेट घेणार



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी फ इंडिया (आठवले) हा पक्ष २००९ पासुन भाजप सोबत युती मध्ये आहे तेव्हापासुन आजपर्यंत झालेल्या एकाही निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एक ही लोकसभा किंवा विधानसभेची जागा सोडलेली नाही .रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष ना. रामदास आठवले यांना देखील कॅबिनेट मंत्री न करता त्यांना राज्यमंत्री पदावर कायम ठेवले आहे . रिपब्लिकन पक्षाला विधानपरिषदेवर राज्यपाल नियुक्त आमदारकी देखील मिळणे गरजेचे होते परंतु आज जाहीर झालेल्या यादीत रिपब्लिकन चेहरा न दिसल्यामुळे अनेक इच्छुक जेष्ठ नेते देखील ह्या प्रकारामुळे संभ्रमात पडले आहेत कि महायुती आपल्या पक्षासोबत अस का करत आहे .

त्यामुळे रिपब्लिकन पक्षातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मनात महायुती व विशेषतः भाजप विषयी नाराजी वाढली आहे कारण रिपब्लिकन पक्षाची युती हि भाजप सोबत मागच्या १० वर्षांची आहे व काल परवा आलेल्या पवार व शिंदे यांच्या पक्षाला महत्व देवून आंबेडकरी पक्षाला विधानसभा व लोकसभे मधुन वंचित ठेवण्याच काही कारस्थान तर रचले जात नाही ना याबाबत पक्षाच्या अनेक निष्ठावंत नेते , पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मनात विचार येत आहेत .कारण नोंदणीकृत रिपब्लिकन पक्षाला जर राजकीय मान्यता मिळवायची असेल तर विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करुन निवडुन आणणे व पक्षाला सहा टक्के मते मिळवणे गरजेच आहे .अस असताना महायुतीने नेते रिपब्लिकन पार्टी फ इंडियाचे राष्ट्रिय अध्यक्ष ना रामदास

पान २ वर...